
योजना

वर्ष ३ अंक ९
दि. १ डिसेंबर ७



चित्रपट आणि चित्रवाणी संस्था

पुणे येथील फिल्म अँड टेलिव्हिजन इन्स्टिटचूटचे रूपांतर आता सोसायटीत झाले आहे. आतापर्यंत माहिती आणि नभोवाणी मंत्रालयाच्या नियंत्रणाखाली असलेली ही संस्था स्वायत्त झाली असून तिचा कारभार संस्थेच्या नियामक मंडळामार्फत चालेल. या संस्थेचा दीक्षांत समारंभ दि. २ ऑक्टोबर रोजी साजरा झाला.

फिल्म इन्स्टिटचूट ऑफ इंडियाची स्थापना १९६१ मध्ये झाली आणि त्यानंतर तिचे फिल्म अँड टेलिव्हिजन इन्स्टिटचूट ऑफ इंडिया असे नामांतर झाले. या संस्थेत नव्याने टेलिव्हिजन प्रशिक्षण विभाग सुरू करण्यात आल्याने हा बदल करण्यात आला.

चित्रपट दिग्दर्शन आणि पटकथा लेखन, चलत्‌चित्रपट, छायाचित्रण, ध्वनिमुद्रण आणि ध्वनिशास्त्र, चित्रपट संकलन आणि चित्रपट अभिनय हे अभ्यासक्रम या संस्थेत चालविले जातात. अभ्यासक्रमात सैद्धांतिक आणि प्रात्यक्षिक या दोन्ही बाजूंवर भर दिला जातो. संस्थेतील अनुभवी अध्यापक वर्गाबरोबरच संस्थेस वारंवार भेट देणाऱ्या चित्रपट उद्योगातील नामवंत तज्ञांचेही विद्यार्थ्यांना मार्गदर्शन मिळते.

प्रात्यक्षिक प्रशिक्षणाचा भाग म्हणून विद्यार्थी विविध प्रकारचे चित्रपट तयार करतात. त्यात छोटे कथा चित्रपट, माहितीपट, जाहिराती विषयक चित्रपट आदींचा समावेश व अंतर्भाव असतो. मुंबई, कलकत्ता आणि मद्रास यासारख्या चित्रपटनिर्मितीच्या प्रमुख केंद्रात चित्रपट उद्योगातील नामवंत व्यक्तींना हे चित्रपट दाखविले जातात. विद्यार्थ्यांच्या प्रगतीची माहिती चित्रपट उद्योगास व्हावी, हा या चित्रपट प्रदर्शन कार्यक्रमामागील उद्देश असतो. १९७३-७४ मध्ये येथील विद्यार्थ्यांनी सुमारे १० चित्रपट तयार केले.

विद्यार्थ्यांनी तयार केलेले असे चित्रपट आंतरराष्ट्रीय व भारतीय चित्रपट महोत्सवासाठीही पाठविले जातात. विद्यार्थ्यांनी अशा प्रकारे तयार केलेल्या २२ चित्रपटांना ३५ चित्रपट महोत्सवात आतापर्यंत आंतरराष्ट्रीय सन्मान मिळाला आहे. भारतीय चित्रपट महोत्सवातही काही चित्रपटांनी पारितोषिके मिळविली आहेत. संस्थेने विद्यार्थ्यांच्या मदतीने आतापर्यंत 'रायी रायी', 'पिया का घर', 'बिजली' व 'जय जवान जय मकान' हे चार कथा चित्रपटही तयार केले आहेत. यापैकी दोन चित्रपट व्यापारी स्वरूपावर प्रदर्शित करण्यात आले आहेत.

संस्थेचे दहा पदविकाधारक देशाच्या चित्रपट क्षेत्रातील विविसन्मानास पात्र ठरले आहेत. संस्थेचे विद्यार्थी श्री. सी. जे. पौलो यांनी तयार केलेल्या 'ए डे विथ दी बिल्डर्स' या चित्रपटास १९७ चे सर्वोत्कृष्ट माहितीपटाचे 'फिल्मफेअर' पारितोषिक मिळाले आ तिसऱ्या ग्रेनोबल आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवातही या चित्रपटा गौरव करण्यात आला. ग्रेनोबल चित्रपट महोत्सवाच्या परीक्षकां परदेशी प्रवास आणि अभ्यासासाठी संस्थेच्या एका विद्यार्थ्यास पाठवि ण्याकरिता शिष्यवृत्ती बहाल केली आहे. मॉस्को व हेलसिंकी येथी चित्रपट संस्थांच्या बरोबर या संस्थेस हा मान मिळाला.

आतापर्यंत या संस्थेतून ५७० विद्यार्थी प्रशिक्षण घेऊन बाहे पडले आहेत. त्यात ४१ विद्यार्थी परदेशातील आहेत. सध्या संस्थेच्य हजेरीपटावर १७० विद्यार्थी असून, त्यापैकी चालू वर्षी ६५ विद्यार्थ्यां प्रवेश घेतला आहे.

गेल्या चौदा वर्षात या संस्थेने चित्रपट उद्योगास अनेक बुद्धिवा तंत्रज्ञ व कलावंत दिले आहेत. मणी कौल, अदूर गोपालकृष्णन्, कुमा शहानी, के. के. महाजन, प्रेम सागर, एस. के. नाग, नरेंद्र सिंग, कुलदी सूद, अरुणा देसाई, शत्रुघ्न सिन्हा, जया भादुरी, रेहाना सुलतान नवीन निश्चल, असरानी आदींचा त्यात समावेश आहे. 'माया दर्पण 'स्वयंवरम्,' 'उसकी रोटी' आदीसारखे चाकोरीबाहेरचे चित्रपटह काही विद्यार्थ्यांनी तयार केले आहेत. योग्य संधी मिळाली त संस्थेचे विद्यार्थी भारतीय चित्रपटसृष्टीस मोलाचा हातभा लावू शकतात, हेच यावरून सिद्ध होते. ● ●

युवक व्यासपीठ

दि. १५ जानेवारी १९७५ च्या अंकातील **'युवक व्यासपीठ'** या सदरासाठी पुढील विषयावर विद्यार्थी-वाचकांनी आपले विचार कळवावेत. लेख जास्तीत जास्त २०० शब्दांचा आणि कागदाच्या एका बाजूस लिहिलेला असावा. लेख पाठवताना आपले नांव व पूर्ण पत्ता तसेच शिक्षणसंस्थेचे नाव कळवावे.

"मताधिकाराचे वय २१ वरून खाली आणावे का ?"

लेख आमच्याकडे दि. २५ डिसेंबरपर्यंत पोचले पाहिजेत. याबाबत पत्रव्यवहार केला जाणार नाही.

आर्थिक, औद्योगिक, विकासविषयक

माहितीसाठी नियमितपणे

पाक्षिक योजना वाचा

वार्षिक वर्गणी ६ रु.

विद्यार्थी, शिक्षक, वाचनालय

यांना २५ टक्के सूट

योजना

नियोजन मंडळाच्या वतीने, असामी, इंग्रजी, गुजराती, तमिळ, तेलुगु, बंगाली, मल्याळम्, मराठी आणि हिंदी भाषातून प्रकाशित होणारे पाक्षिक.

वर्ष ३ रे] दि. १ डिसेंबर १९७४ [अंक ९ वा
December 1, 1974
(१० अग्रहायण १८९६)

अंतरंग

- प्रादेशिक भाषांतील चित्रपट —सु. द. शिदोरे ४
- औद्योगिक दृष्टचा विदर्भ मागासलेलाच —प्रा. वा. ग. महाजन ६
- चाऱ्यासाठी नी लोकरीसाठी रानोमाळ १०
- मंदीची चाहूल की हाकाटी? —सुभाष सोनवणे १२
- ग्रामीण भागांच्या गरजांकडे दुर्लक्ष! —प्रा. एम. ए. कोहोक १६
- रुचिपालट —लक्ष्मीदास बोरकर १८
- बालगुन्हेगारीची समस्या —खु. चि. पेंडसे १९

मुख्य संपादक **एस. श्रीनिवासचार**

मराठी आवृत्ती संपादक **अविनाश गोडबोले**

सहाय्यक संपादक **रजनीकांत प्रधान**

उपसंपादक **श्री. श्री. भट**

सजावट : **प्रकाश विश्वासराव**

संपादकीय

जागतिक अन्न परिषद

जगातील एकूण लोकसंख्या या क्षणी अंदाजे ७०० कोटी धरली तर त्यापैकी ७ ते १२ कोटी लोक दरवर्षी केवळ पोटभर अन्न न मिळाल्याने वा भुकेने मृत्यु पावतात, तर जगातील १०० कोटी बालकांपैकी सुमारे ६५ कोटी मुलांना पुरेसे आणि सकस अन्नही मिळत नाही अशी अवस्था आहे. या पृथ्वीवर जमीन वाढत नाही, शेतीखालील क्षेत्रही फारसे वाढत नाही, परंतु खाणारी तोंडे मात्र दरसाल वाढत आहेत. अपुरे धान्योत्पादन ही जगातील विकसनशील, विशेषत: अफाट लोकसंख्या असलेल्या आशिया, आफ्रिका व अमेरिकेच्या दक्षिण गोलार्धातील लॅटिन अमेरिकन देशांपुढील एक चिंताजनकच नव्हे तर महाभयंकर समस्या आहे.

जगातील $\frac{2}{3}$ लोकसंख्या या तीन खंडात सामावली आहे हे लक्षात घेऊन त्याचप्रमाणे या समस्येने जागतिक पातळीवर घेतलेले व्यापक व उग्र स्वरूप लक्षात घेऊन संयुक्त राष्ट्र संघटनेने आपल्या जागतिक अन्न संघटनेच्या विद्यमाने, नुकतीच रोम येथे एक जागतिक अन्न परिषद बोलावली होती. ही परिषद दि. १७ नोव्हेंबर रोजी संपली.

या परिषदेपुढे युनोच्या तज्ञांनी जे अहवाल सादर केले त्यावरून असे म्हणता येईल की येत्या १० वर्षांतील वाढती लोकसंख्या लक्षात घेता जगातील धान्योत्पादनात वार्षिक २.५ टक्क्यांनी वाढ झाली नाही तर परिस्थिती अधिकच बिकट होत जाईल. हा प्रश्न भारतासारख्या विकसनशील राष्ट्रांपुढे आतापासूनच 'आ' वासून उभा आहे. यापुढील दर दहा वर्षाच्या अवधीत आम्ही २ कोटी टनांनी धान्योत्पादनात वाढ घडवून आणली नाही तर भारतात परिस्थिती आणखीनच बिकट होत जाईल, असा इषारा तज्ञांनी केव्हाच दिला आहे.

जागतिक धान्यटंचाईच्या समस्येचा विचार करून त्यादृष्टीने आवश्यक ती उपाययोजना करण्यासाठी युनोच्या नियंत्रणाखाली एक जागतिक अन्न महामंडळ स्थापन करण्याचा भारताचा प्रस्ताव परिषदेने मंजूर केला. याखेरीज जगातील विकसनशील राष्ट्रांना मदतीचा हात देण्याच्या हेतूने अनेक मोलाच्या सूचना या परिषदेत करण्यात आल्या. त्यात अवर्षण वा पूर यामुळे पिकांची हानी झाल्यास त्या परिस्थितीस तोंड देण्यासाठी म्हणून दरसाल १ कोटी टन अन्नधान्याचा राखीव साठा करणे, जागतिक धान्य बँक निर्माण करणे, विकसनशील देशांना खते, जंतुनाशके पुरेशा प्रमाणात उपलब्ध होतील असे मन:पूर्वक प्रयत्न करणे, त्यासाठी कर्ज पुरवठा आर्थिक साह्य देणे, शेतीयोजनांना मदत करणे इ.

विकसनशील देशांना अन्नटंचाईच्या परिस्थितीला तोंड देता यावे, अधिक धान्योत्पादन करता यावे म्हणून जगातील श्रीमंत व विकसित देशांनी अशा प्रकारे मदतीचा हात पुढे केला तरी त्यामुळे मूळ समस्या पूर्णतया सुटू शकणार नाही. असे परावलंबी राहून आम्हांला चालण्यासारखे नाही. यासाठी भारतासारख्या देशांना आपल्या योजनात शेती विकासावर अधिकाधिक भर देण्याखेरीज आणि धान्योत्पादनावरील पूरक अशा कार्यक्रमांना प्राधान्य देण्याखेरीज तरणोपाय नाही या काही अर्थतज्ञांनी दिलेल्या इशाऱ्याचा गंभीरपणे विचार करावा लागेल व प्रत्यक्ष कृती विनाविलंब हाती घ्यावी लागेल. यासाठी, शेती व्यवसायाशी निगडित असलेल्या साऱ्यांनाच या इशाऱ्याची दखल घेऊन आपापल्यापरीने धान्योत्पादनात वाढ घडवून आणण्याचे प्रामाणिक प्रयत्न व कष्ट

प्रादेशिक भाषांतील चित्रपट

कलादृष्ट्या अधिक सरस

—सु. द. शिदोरे

प्रादेशिक भाषेतील चित्रपट म्हणजे दर्जेदार चित्रपट असे समीकरण सहज मांडता येईल. या चित्रपटांनी आपली ही परंपरा वेळोवेळी सिद्ध केली आहे. १९३७ साली व्हेनिस येथे भरलेल्या आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात ज्या पहिल्या भारतीय चित्रपटाने पारितोषिक पटकावले तो होता मराठी भाषेतील चित्रपट 'संत तुकाराम'. त्यानंतर स्वातंत्र्योत्तर कालात चित्रपटांनी राष्ट्रपती पारितोषिके देण्याची प्रथा सुरू होताच पहिले राष्ट्रपती सुवर्णपदक पटकाविणारा चित्रपटही प्रादेशिक भाषेतीलच होता आणि तो म्हणजे अत्रे पिक्चर्सचा "श्यामची आई".

भारतीय चित्रपटांना व चित्रपटनिर्मितीला जगात मानाचे स्थान मिळवून देणारा यानंतरचा चित्रपटही हिंदी भाषेतील नव्हता तर तो होता "पथेर पांचाली" हा सत्यजित रॉय यांचा बंगाली चित्रपट. हिंदी चित्रपट निर्मितीच्या तुलनेने हा चित्रपट काढण्यासाठी श्री. रॉय यांना केवढे कष्ट पडले, कोणकोणत्या अडचणीतून जावे लागले, त्याची एक भावस्पर्शी कथाच होईल.

आता १९७३ सालातील राष्ट्रीय पारितोषिकांचा कल पाहिला तरीही प्रादेशिक भाषेतील चित्रपट किती दर्जेदार असतात हेच सिद्ध होते. या पारितोषिकात १९७३ मध्ये पहिले स्थान पटकावले ते मल्याळी भाषेतील "निर्माल्यम्" या चित्रपटाने आणि दुसरे स्थान "कादु" या कन्नड चित्रपटाने. संख्येच्या दृष्टीने विचार केला तर १९७३ मध्ये निर्माण झालेल्या एकूण चित्रपटांपैकी ३० टक्के म्हणजे १३६ चित्रपट हिंदी भाषेतील होते, तर मल्याळी व कन्नड चित्रपटांची संख्या अनुक्रमे ६० व ३२ एवढीच होती.


लोकजीवनाशी समरसता

प्रादेशिक भाषेतील चित्रपटांतून लोकजीवनाचे प्रतिबिंब दिसते, लोकांच्या भावजीवनाशी त्यातील कथानके स्पर्शून जातात हे या चित्रपटांनी वेळो वेळी सिद्ध केले आहे. हिंदी चित्रपटांच्या बाबतीत असे म्हणता येणार नाही, विशेषतः युद्धोत्तर काळातील हिंदी चित्रपटांचा आणि लोकजीवनाचा सुसंवाद बहुतांशी संपला आहे. आपल्या सांस्कृतिक व सामाजिक जीवनाशी हिंदी चित्रपटांचा जणू काही संबंधच उरलेला दिसत नाही. हिंदी चित्रपटांच्या कथानकांना काही मूलाधार आहे का याची शंकाच वाटू लागली आहे. देशात विविध भाषा बोलणाऱ्या आणि विविध परंपरेच्या लोकांची तथाकथित आवड लक्षात घेऊन हिंदी चित्रपट निर्माते चित्रपट काढतात आणि त्यामुळे त्यात वास्तवतेला जराही थारा नसतो. चित्रपट कोणत्याही भाषेतील नव्हे जगाच्या कोणत्याही भागातील प्रेक्षकाच्या अंतःकरणाला भिडावा अशी अपेक्षा असेल तर त्या चित्रपटाच्या कथानकाची बीजे व मुळे लोकजीवनात तसेच लोकांच्या भावविश्वात दृढमूल झालेली असली पाहिजेत, ही गोष्ट हिंदी चित्रपट निर्मात्यांच्या लक्षात येत नाही.

प्रादेशिक जीवनाचे वास्तव चित्रण करण्याचा एखाद्या चित्रपटाने (मग तो हिंदी भाषेतील का असेना) प्रामाणिक प्रयत्न केला तर तो चित्रपट कलागुणदृष्ट्या निश्चितपणे अधिक सरस निघेल याच कारणांनी मर्यादित खर्च करून निघालेले प्रादेशिक चित्रपट अधिक दर्जेदार ठरतात, कारण लोकजीवन व लोकभावना त्या



चित्रपटांना राष्ट्रपती पारितोषिके देण्यास प्रारंभ झाला त्याच वर्षी राष्ट्रपती सुवर्णपदक पटकावणाऱ्या आचार्य अत्रे यांच्या 'श्यामची आई' चित्रपटात वनमाला व माधव वझे.



"श्यामची आई" चित्रपटाला मिळालेल्या राष्ट्रपती सुवर्णपदकाचा डॉ. राजेंद्रप्रसाद यांच्या हातून स्वीकार करीत असताना निर्माते कै. आचार्य अत्रे.

अधिक स्पष्टपणे प्रतिबिंबीत झालेली असतात. म्हणूनच असे म्हणता येईल की बंगाली वा मल्याळी या प्रादेशिक भाषेतील चित्रपट आमच्या कलाजीवनाचे खरे प्रतिनिधीत्व करतात, हिंदी चित्रपट नव्हे. अर्थात हिंदी भाषेतील काही चित्रपट कलात्मकदृष्ट्या निश्चितपणे दर्जेदार निघाले आहेत हेही नाकारता येणार नाही. भडक, अवास्तव, केवळ तंत्रदृष्ट्या उत्कृष्ट असे चित्रपट काढण्याऐवजी काही हिंदी चित्रपट निर्मात्यांनी उत्कृष्ट, दर्जेदार कथानकावर आधारित चित्रपट काढले असून ते अतिशय लोकप्रियही ठरले आहेत.

गळेकापू स्पर्धा

असे असताही प्रादेशिक चित्रपटांना आपले व्यक्तिमत्व, वैशिष्ट्य टिकविण्यासाठी प्रखर झगडा करावा लागतो. हिंदी चित्रपट रंगीत निघतात, त्यात नामवंत चित्रपट तारका व तारे असतात, पैशाच्या जोरावर हे चित्रपट भव्य सेट्स उभारून डोळे दिपवू शकतात, सुमधूर गाणी, भव्य देखाव्याच्या पार्श्वभूमीवर भव्य नृत्ये सादर करू शकतात, डोळे दिपविणारे पोशाख पात्रांना देऊ शकतात. या तुलनेत प्रादेशिक चित्रपटांना हिंदी चित्रपटांशी चांगलीच स्पर्धा करावी लागते, झुंज घ्यावी लागते. थिएटरवाले देखील रंगीत, भव्य हिंदी चित्रपट आपल्या थिएटरात लावणे पसंत करतात. काळ्यापांढऱ्या फिल्मवर घेतलेले कमी खर्चात तयार केलेले प्रादेशिक चित्रपट लावणे त्यांना पसंत नसते. अर्थात कोणी म्हणेल की प्रादेशिक चित्रपट गर्दी खेचीत नाहीत, चांगला धंदा करीत नाहीत, तर त्यात काही फारसा अर्थ नाही. या चित्रपटांना प्रदर्शनाची पुरेशी संधी मिळत नाही, लोकापर्यंत ते पुरेसे पोहोचू शकत नाहीत, असेच म्हणणे योग्य ठरेल. देशात सर्वत्र सरकारी मालकीच्या आर्ट-थिएटरांची चित्रपटगृहांची उभारणी मोठ्या प्रमाणात होऊ लागली की दर्जेदार प्रादेशिक तसेच हिंदी चित्रपटांना आपले सोने पारखून घेण्याची खरीखुरी संधी प्राप्त होईल. तसेच प्रादेशिक चित्रपटांचे हिंदी भाषेत वाढत्या प्रमाणात रूपांतर (डबिंग) झाल्यासही प्रादेशिक भाषेतील चित्रपटांना अधिक चांगले दिवस येऊ लागतील.

चित्रपट अर्थ महामंडळ

चित्रपट अर्थ महामंडळाने अनेक दर्जेदार, कलात्मक, वास्तववादी प्रादेशिक तसेच हिंदी चित्रपटांना पैसा पुरवून त्यांच्या निर्मितीस चांगले प्रोत्साहन दिले आहे, हे सर्वांना माहीतच आहे. या महामंडळाने अशा प्रकारे अर्थसहाय्य केलेल्या चित्रपटांची संख्या लक्षात घेतली तरती गेल्या १४ वर्षात २६६ हिंदी चित्रपट व २०५ प्रादेशिक भाषेतील चित्रपट अशी येते. विशेष म्हणजे, सर्वच भाषांना महामंडळाने असे अर्थसहाय्य केलेच आहे; परंतु ओरिया भाषेत १९६३, ६७ व ६९ साली निघालेले सर्व चित्रपट केवळ या अर्थसाह्यामुळेच निघू शकले ! सत्यजित रे यांचे "चारुलता" व "नायक" (बंगाली), मृणाल सेन यांचे "पदातिक" (बंगाली), व्ही. शांतारामचे "इये मराठीचिये नगरी" (मराठी), मणीलाल राठोड यांचे "कंक" (गुजराती), सत्यदेव दुबे यांचे "शांतता, कोर्ट चालू आहे" (मराठी), अे. गोपालकृष्ण यांचे "स्वयंवरम्" (मल्याळी), एस. एस. राव यांचे 'दिक्कत पवित्री' (कथा मूळ राजाजींची. १९७३ च्या राष्ट्रीय स्पर्धेत तामीळ भाषेतील उत्कृष्ट चित्रपट म्हणून मान्यता) आदी उत्कृष्ट चित्रपटांना चित्रपट अर्थ महामंडळानेच अर्थसहाय्य केले.

महामंडळाकडून चित्रपटांना पैसा पुरविताना तो चित्रपट कोठल्या भाषेत आहे ते पाहिले जात नाही, तर चित्रपटाचा कलात्मक दर्जा किती आहे ते लक्षात घेऊन अर्थसहाय्य केले जाते. अर्थात एक गोष्ट निश्चित आहे आणि ती ही की अर्थसहाय्यासाठी अर्जाची छाननी करताना हिंदी चित्रपटांशी तुलना करता प्रादेशिक भाषातील चित्रपटांत कलागूण अधिक असतात, असेच आढळून आले आहे.

अर्थात, आपल्या देशात प्रादेशिक चित्रपटांपुढील समस्या अधिक बिकट आहेत, विशेष स्वरूपाच्या आहेत, हे लक्षात घेतले पाहिजे आणि त्यावर तशाच खास उपाययोजनाही हाती घेतल्या गेल्या पाहिजेत. या बाबतीत चित्रपट अर्थसहाय्य महामंडळ आपल्या परीने प्रादेशिक भाषेतील, तसेच हिंदीतीलही उत्कृष्ट, दर्जेदार चित्रपटांना साह्य करण्याचा प्रयत्न करीत आहे. आज एवढेच म्हणता येईल की प्रादेशिक भाषेतील चित्रपटच सध्या खऱ्या अर्थाने भारतीय जीवनाचे वास्तववादी व कलापूर्ण चित्रण करीत असून त्यांना भविष्यकाळ उज्ज्वल आहे.

श्री. शिदोरे,
तांत्रिक सल्लागार,
चित्रपट अर्थ महामंडळ, मुंबई.

भारतात महाराष्ट्र औद्योगिक दृष्टचा विकसित असल्याचे म्हटले जाते पण ते एक अर्धसत्य आहे. राज्यातील मुंबई, पुणे हे विभाग सोडल्यास विदर्भ, मराठवाडा हे विभाग औद्योगिक दृष्टचा मागासलेले आहेत. १९६१ मध्ये महाराष्ट्रात ९८७० कारखाने होते, त्यापैकी ६५१८ किंवा २/३ कारखाने मुंबई, ठाणे, पुणे या विभागात होते. मार्च १९७० अखेर महाराष्ट्रात ६,४९० जॉइंट स्टॉक कंपन्या होत्या त्यापैकी ५,९६५ (९२%) मुंबई, पुणे, ठाणे विभागात होत्या. याउलट विदर्भ, मराठवाडा, कोकण विभागात एकही नव्हती. याचाच स्पष्ट अर्थ असा की औद्योगिक महाराष्ट्र मुंबई, पुणे, ठाणे यांच्या सीमारेषेतच एकवटला आहे. यात विदर्भाचे स्थान कोठे आहे, असा प्रश्न लेखकाने केला आहे.

औद्योगिक दृष्ट्या पुढारलेल्या महाराष्ट्रात

विदर्भ/मागासलेला!

—प्रा. वा. ग. महाजन

महाराष्ट्राच्या निरनिराळ्या विभागातील प्रादेशिक असमतोल दूर करण्याच्या दृष्टीने १९३७ पासून प्रयत्न सुरू आहेत. १९४६-४७ ची युद्धोत्तर विकास योजना, पुढे नियोजनाचा कालखंड, १९७०–७१ ची वार्षिक योजना ठरविताना जिल्हा हा नियोजनाचा आधारभूत घटक ठरवूनसुद्धा हा प्रादेशिक असमतोल अद्यापी कायम आहे आणि विदर्भ विभाग तर उपेक्षितच आहे. याच संदर्भात The Planning of Free Societies या पुस्तकात झुवीग म्हणतात 'मागास विभाग, मागास वर्ग, मागास लोक यांचा विकास हीच नियोजनाची प्रमुख उद्दिष्टे असावीत.' परंतु प्रत्यक्षात भारतीय नियोजनात हा दृष्टीकोन आढळून येत नाही. वास्तविक नियोजन मंडळाने महाराष्ट्र राज्याच्या २५ जिल्ह्यांपैकी १३ जिल्हे म्हणजे महाराष्ट्राचा ५४ टक्के भाग आणि ४३ टक्के लोकसंख्या 'मागास' असे म्हटले आहे. याची तुलना औद्योगिक दृष्टचा मागास जाहीर झालेल्या बिहारशी केली जाऊ शकते. पांडे समितीच्या शिफारशीप्रमाणे महाराष्ट्रातील काही मागास विभाग हे तर इतर राज्यातील मागास विभागापेक्षा दुरावस्थेत आहेत. श्री. द. रा. पेंडसे आपल्या 'समतोल प्रादेशिक विकास' या निबंधात म्हणतात की, एकूण लोकसंख्येच्या किती टक्के लोक कारखान्यात आहेत यावरूनही औद्योगीकरणाचा अंदाज काढता येतो. महाराष्ट्राचा अंदाज खालील तक्त्यावरून स्पष्ट होतो.

(१९७१ ची आकडेवारी)

विभाग	दर हजार लोकवस्तीमागे फॅक्टरी कामगारांची संख्या	राज्यातील एकूण कामगारांपैकी किती टक्के
बृहन्मुंबई	९९	५९.४ टक्के
ठाणे	४७	१०.६ टक्के
पुणे	२५	८ टक्के
नागपूर	१५	१ टक्का
मराठवाडा	१	

(संदर्भ–पेंडसे यांचा प्रबंध)

वरील तक्त्यावरून मुंबई, ठाणे, पुणे या विभागात कारखाने व कामगार यांचे केंद्रीकरण झालेले आढळून येते. संपूर्ण देशात मराठवाडा हा भाग 'मागास' असल्याचे नियोजन मंडळाने जाहीर केले आहे. महाराष्ट्र शासनाला अशा एकांगी विकासाची जाणीव आहे. कारण विदर्भात उद्योगासाठी योग्य वातावरण निर्माण करण्याची धडपड दिसते, परंतु यश अल्प आहे. ग्रामीण व मागास विभागात उद्योग काढायचा झाल्यास जमीन, पाणी, वीज, भूगर्भ संपत्ती, मनुष्यबळ याचा अंदाज घ्यावा लागेल. प्रादेशिक नियोजनाचे अशा प्रकारचे प्रयत्न महाराष्ट्र शासनाने विदर्भात सुरू केले आहेत का? हा प्रश्न महत्वाचा आहे. प्रयत्न आणि प्रगती याचा आढावा घेतल्यास पुनः विदर्भ उपेक्षित आहे हे आढळून येईल.

औद्योगिक विकासाच्या दृष्टीने विदर्भ फार पूर्वीपासूनच उपेक्षित आहे. राज्य पुनर्रचनेपूर्वी मध्यप्रदेशात हा भाग समाविष्ट होता. त्यावेळच्या त्या राज्याच्या पंचवार्षिक योजनेत विदर्भाच्या औद्योगिक विकासाकडे दुर्लक्ष झाले. विकासाची गती अशा प्रकारे मंदावत गेली. राज्य पुनर्रचनेनंतर विदर्भाचा भाग महाराष्ट्रात समाविष्ट करण्यात आला आणि १९६० पासून विदर्भाच्या औद्योगिक विकासाच्या गतीला चालना देण्याचे प्रयत्न सुरू झाले. १९६० ते १९७० या कालावधीत महाराष्ट्रात विदर्भाची औद्योगिक परिस्थिती कशी होती ते खालील तक्त्यावरून स्पष्ट होईल.

	१९६१		१९७०	
विभाग	चालू कारखाने	कामगार (हजारात)	चालू कारखाने	कामगार (हजारात)
मुंबई	५३८५	५८९	६५४२	७१२
पुणे	१७४४	११२	२०४६	१५४
नागपूर	८६३	७०	९६३	७०

(संदर्भ–महाराष्ट्र शासन पुस्तिका)

दुसऱ्या पंचवार्षिक योजनेत विदर्भाच्या विकासाचे यत्न सुरू होतील असे वाटले. परंतु प्रादेशिक असमतोल संतुलित करण्याचे सरकारचे प्रयत्न नव्हते ही गोष्ट खालील तक्त्यावरून स्पष्ट होते. १९५६–६१ हा कालावधी मध्यप्रदेश-महाराष्ट्र या दोन राज्याच्या प्रयत्नात येतो. तरी पण पश्चिम महाराष्ट्राच्या तुलनेत असमतोल कायम राहिला.

१९६० चे हे चित्र बघा

विकासाची बाब	मुंबई विभाग (मुंबई शहर सोडून)	पुणे विभाग	नागपूर विभाग
१. प्रत्येक एकरी कृषी उत्पादनाचे एकूण मूल्य	रु. १३०	रु. १११	रु. १०४
२. पिकांकरिता पाट-बंधाऱ्याच्या सोयीचे प्रतिशत प्रमाण	४.६%	९.९%	५.१%
३. रस्ते (किलोमीटर) १०० किलोमीटर क्षेत्रामागे	२०.५५	१८.२५	७.००
४. १००० लोकसंख्ये-मागे विद्यार्थ्यांचे प्राथमिक शिक्षणाचे प्रमाण	११९	१२४	८२
५. रजिस्टर झालेल्या उद्योगांची नोंद	३१,०००	१३,०००	६,५००

(संदर्भ–महाराष्ट्र शासन–विदर्भ पुस्तिका)

१९६०च्या आर्थिक विकासाच्या वरील चित्रात कृषी, पाट-बंधारे, रस्ते, शिक्षण, उद्योग विकासाच्या या क्षेत्रात विदर्भाची सर्वत्र पीछेहाट दिसून येते. विदर्भ विभाग 'मागास विभाग' असूनसुद्धा जीवनाच्या प्रारंभिक गरजाच नव्हे तर शिक्षण, उद्योग या क्षेत्रातही तो मागे आहे.

१९६१–६६ या कालखंडातसुद्धा विदर्भ व पश्चिम महाराष्ट्र या विभागाची सांख्यकीय दृष्ट्या तुलना केल्यास पुनः महाराष्ट्र शासनाचा उपेक्षित दृष्टीकोण लक्षात येतो.

१९६८–६९ पर्यंत १४.०८ कोटी रुपयापर्यंत खर्चाची रक्कम वाढविण्यात आली. वरील आकडेवारीवरून एक गोष्ट लक्षात येईल की महाराष्ट्र शासनाने विकास वेग वाढविण्याकरिता पश्चिम महाराष्ट्र व विदर्भ विभागात कशा प्रकारे प्रयत्न केला. पश्चिम महाराष्ट्रात १३ जिल्हे (क्षेत्र ८९,७७४ चौ. मीटर) लोकसंख्या २.४० कोटी आणि विदर्भात ५३,८३० चौ. मीटर क्षेत्र, ८ जिल्हे आणि लोकसंख्या ९२.३३ लाख आहे. या आढाव्यात विदर्भाच्या ९२.३३ लाख लोकसंख्येचे दरडोई उत्पन्न १०० रु. असणे ही एकच गोष्ट विदर्भाच्या विकासाच्या बाबतीत लक्षणीय ठरेल.

तृतीय पंचवार्षिक योजना

विभाग	लोकसंख्या (१९६१ प्रमाणे)	खर्चाचे प्रमाण (कोटी रुपयांत)	(दर डोई रु.)
पश्चिम महाराष्ट्र	२.४० कोटी	२२८.४४	९१.२
विदर्भ	९२.३३ लाख	९२.७२	१००.७

१९६६-६७ आणि १९६७-६८ च्या वार्षिक योजना

	लोकसंख्या १९६१ प्रमाणे	खर्चाचे लक्ष्य एकूण कोटी रुपयात	प्रतिव्यक्ति रुपयात
पश्चिम महाराष्ट्र	२.४० कोटी	९६.८४	३४.९
विदर्भ	९२.३३ लाख	४५.३८	४३.४

(संदर्भ–डेव्हलपमेंट ऑफ विदर्भ–रिव्हयू)

औद्योगिक विकासासाठी महामंडळाची स्थापना

समतोल विकास साधण्याकरिता महाराष्ट्र शासनाने १ ऑगस्ट १९६२ ला महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाची स्थापना केली व या मंडळाची शाखा विदर्भात उघडण्यात आली. या मंडळाकडे राज्याच्या अविकसित भागात वीज, पाणी, जमीन, रस्ते इत्यादी सोयी उद्योगांना उपलब्ध करून देऊन या भागात उद्योगधंदे निघण्यास जरूर ते आकर्षण निर्माण करणे, औद्योगिक क्षेत्रे निर्माण करणे इत्यादी कार्ये या मंडळावर सोपविण्यात आली. विदर्भाच्या आठ जिल्ह्यामधून नागपूर, अकोला व घूघूस (चंद्रपुर) या तीनच जिल्ह्यात औद्योगिक क्षेत्रे निर्माण कार्य या मंडळानी आपल्याकडे घेतले. नागपूरजवळ हिंगणा रस्त्यावर १०८० एकर जमिनीत आता काही उद्योग खालील तक्त्याप्रमाणे अस्तित्वात येतील:

सिकॉम महामंडळाच्या प्रयत्नांनी सुरू झालेले उद्योग

स्थान	संख्या	प्रकल्पाकरिता खर्च (हजार रु.)	किती लोकांना काम मिळाले
नागपूर	७२	११२४.५२	२३४०

सिकॉम (महाराष्ट्र राज्य औद्योगिक व गुंतवणूक मंडळ) व MIDC मुळे अस्तित्वात येणारे उद्योग

नागपूर	२२	२७८.२३	४५३

(संदर्भ–सिकॉम कार्यालय)

सिकॉमची स्थापना मार्च १९६६ ला झाली. त्यात ३ कोटी ६० लाख रु. महाराष्ट्र शासनाने गुंतविले आहेत. या संस्थेकडे औद्योगिक दृष्ट्या अविकसित भाग, उद्योगप्रारंभणाची आवश्यक माहिती, आर्थिक सहकार्य, निरनिराळ्या सवलती व आवश्यक सेवा या गोष्टी सोपविल्या आहेत.

१९६२ ला MIDC व १९६६ ला SICOM विदर्भात आल्यानंतर महाराष्ट्रातील हा उपेक्षित विभाग औद्योगिक दृष्ट्या कितपत विकसित झाला त्याचा आढावा घेणे इष्ट ठरेल. केवळ नागपूर शहर व चंद्रपूरचा काही भाग सोडल्यास या मंडळाचा विदर्भाच्या विकासाकरिता काहीही उपयोग झाला नाही. उलट नागपूर शहर व इतर जिल्हे यात असमतोल मात्र निर्माण झाला. जे मुंबई, पुणे, ठाणे येथे झाले ते विदर्भाच्या बाबतीत घडले. पश्चिम महाराष्ट्रात मुंबई, पुणे, ठाणे तर विदर्भात नागपूर, चंद्रपूर असाच काहीसा असंतुलित औद्योगिक विकास झाला असे म्हणावे लागेल. विदर्भ विकास मंडळाची स्थापनासुद्धा झाली आहे. एक कोटी रुपये भांडवल महाराष्ट्र शासनाने या मंडळात गुंतविले आहे. या मंडळामुळे साधनसंपत्ती, रोजगार, बी-बियाणे, दुग्धालय प्रकल्प, रेशीम इत्यादी योजना साकार होणार आहेत.

विदर्भाच्या विकासाकरिता सरकारचा उद्योगविभाग, सिकॉम, विभागीय विकास मंडळ, महाराष्ट्र राज्य आर्थिक महामंडळ, एम. आय्. डी. सी., विदर्भ विकास मंडळ, महाराष्ट्र राज्य कृषी औद्योगिक विकास मंडळ व केंद्र सरकारच्या राष्ट्रीयीकृत बँका, लघु उद्योग सेवा संस्था, स्टेट बँक वगैरे संस्था असूनसुद्धा विदर्भ औद्योगिक दृष्ट्या मागास राहावा ही गोष्ट आश्चर्यजनक आहे. विदर्भातील २०० लघु उद्योगांच्या एका पाहणीत विदर्भ उद्योग मंडळाने महत्वाचा निष्कर्ष काढला आहे. हा अहवाल म्हणतो की **"फारच थोड्या उद्योगांना विकास मंडळे, कर्जपुरवठा करणाऱ्या संस्थांची माहिती आहे. त्याचप्रमाणे फक्त मोजक्याच उद्योगांना महाराष्ट्र शासनाच्या विकास योजनांचा फायदा झाला आहे." याचा अर्थ असा की विकास योजना नागपूरात केंद्रित झाल्या. त्यांनी इतर जिल्ह्यांतील उद्योग चालकांना या योजनांची माहिती दिली नाही.** हाच अहवाल पुढे म्हणतो की, "आठ जिल्ह्यांचा हा मागास विदर्भ नैसर्गिक साधनसंपत्तीने समृद्ध असूनसुद्धा उद्योगस्थापनेचे वातावरण निर्माण होऊ शकले नाही" याउलट सरकारच्या २८ जानेवारी १९७४ च्या माहितीत असे म्हटले आहे की, "शासनातर्फे देण्यात येत असलेल्या विविध सवलतींमुळे या विभागाच्या औद्योगिक विकासावर फारच चांगला परिणाम झाला आहे." बहुतेक ही माहिती कागदपत्रांच्या आधारे दिली आहे ! प्रत्यक्षात पाहणी करून नव्हे ! म्हणूनच विकासाच्या संदर्भात हा विरोधाभास निर्माण झाला आहे. १९६९ चे विदर्भातील उद्योगांच्या प्रगतीचे हे चित्र सरकारच्याच आकडेवारीच्या आधारे घेतले आहे.

बुलढाणा जिल्ह्याची आकडेवारी उपलब्ध होऊ शकली नाही. (संदर्भ : कारखाने निरीक्षक–महाराष्ट्र राज्य.) केवळ नागपूर सोडल्यास इतर जिल्ह्यात असमतोल आहे. बंद होणाऱ्या कारखान्यांची संख्या, वर्षभर व वर्षातून काही दिवस चालू असणारे उद्योग यांची संख्या लक्षात घेतल्यास विदर्भ विभाग अतिशय मागासलेला आढळून येतो. १९६९ मध्ये एकंदर ९०१ उद्योगामधून २८३ कारखाने ३०० दिवसापेक्षा जास्त दिवस चालू होते. परंतु उर्वरित कारखाने का बंद होते याचा शोध कुणीही घेतला नाही.

विदर्भ विभाग–१९६९ चे चित्र

क्रमांक	जिल्हा	रजिस्टर्ड उद्योग	बंद झालेले उद्योग	कामगार
१	अकोला	९९	६	७,५३४
२	अमरावती	९८	१८	७,३८६
३	यवतमाळ	८३	१८	५,१३१
४	वर्धा	५३	१४	६,४२३
५	नागपूर	४६२	९४	२५,६५३
६	भंडारा	१९०	२०	१५९१
७	चंद्रपूर	५०	८	४१७५

विदर्भातील सद्य परिस्थिती

महाराष्ट्र राज्याच्या या औद्योगिक दृष्ट्या मागासलेल्य विभागात उद्योगांची कशी अवस्था आहे ते खालील विवेचनावरून कळेल.

(१) बहुतेक उद्योग, विकास व प्रगतीच्या ऐवजी वर्षभर कश प्रकारे जिवंत रहाता येईल या संकटात सांपडलेले आहेत

(२) उद्योग चालक अशिक्षित आहेत, त्यामुळे दुसरा उद्योग काढण्याची त्यांची तयारी नाही.

(३) विदर्भाच्या उद्योगांची पाहणी एका अभ्यास गटाने नुकतीच केली आहे. हा अहवाल म्हणतो की "विदर्भातील उद्योग चालकांचा सरकारवरील विश्वास पूर्ण उडाल आहे. त्यांचेजवळ आवश्यक भांडवल नाही. भांडवल मिळविण्याकरिता मार्ग माहीत नाहीत." (Report o the Sample Survey of 556 SSI Units, Oct 1972)

(४) बहुतेक उद्योगांत जुनी व ज्या यांत्रिक सामुग्रीचा आत उपयोग होणार नाही, अशी यांत्रिक सामुग्री आहे. नवीन यंत्रसामुग्री हप्तेवारीने मिळू शकते ही शासनाची योजन अनेकांना माहीत नाही. माहिती करून देण्यात येत नाही

(५) सरकारचे महाराष्ट्र राज्य वित्तीय मंडळ, सिकॉम य संस्थांनी फारच थोड्या उद्योगांना आर्थिक सहकार दिले आहे.

(६) विकासाच्या ज्या संस्था महाराष्ट्र शासनाने सुरू केल्य आहेत त्यांची माहिती फारच थोड्या उद्योग चालकांन आहे.

(७) काही सवलतीमुळे जे नवीन उद्योग निघाले आहेत ते पुढे सातत्याने चालू ठेवण्याचे प्रयत्न सरकारनिर्मित संस्थांनी केले नाहीत.

(८) जिल्हा उद्योग अधिकाऱ्यांना उद्योगांचे तांत्रिक ज्ञान उद्योगप्रवर्तनाची अवस्था, स्थानिकीकरण इत्यादीबाबतीत माहिती नसल्यामुळे त्यांचे मार्गदर्शन उद्योगचालकांन मिळत नाही.

(९) कच्चा माल, कर्ज मिळण्याकरिता विलंब, इत्यादी बाबतीत उद्‌योगचालकांच्या तक्रारी आहेत.

(१०) जिल्हानिहाय खनिज, जंगल संपत्तीवर उद्‌योग स्थापन झाले नाहीत.

सारांश, उद्‌योग स्थापना, उद्‌योग चालू ठेवणे, आर्थिक सहाय्य, तांत्रिक ज्ञान, सरकारची अभ्यास गटाकडून पाहणी याबाबतीत विदर्भ उद्‌योगपरिसर सरकारकडून उपेक्षित राहिला त्यामुळे असमतोल वाढता राहिला. असंतोष कायम आहे.

काय करता येईल

उपेक्षित विभागाच्या विकासाकरिता खालील सूचना विधायक ठराव्यात.

(१) केंद्र सरकारने प्रादेशिक नियोजनाकरिता 'राज्य' हा घटक लक्षात न घेता विदर्भातील अतिशय मागास विभागात 'राज्य-उपक्रम' किंवा खाजगी उपक्रम स्थापन करावेत. म्हणजेच 'मुक्त क्षेत्रे' विकासाकरिता निवडावीत.

(२) विकास आयुक्ताची नियुक्ती करण्यात यावी. हा अधिकारी IAS पेक्षा वाणिज्य व उद्‌योग स्थापनेविषयी ज्ञान असलेला असावा.

(३) महाराष्ट्राच्या एकूण जंगलसंपत्तीमधून विदर्भातील एकटचा चंद्रपूर जिल्ह्यात २९.७१ टक्के वने आहेत. राज्यातील एकूण वनांपैकी संपूर्ण विदर्भात ५८.३९ टक्के वने आहेत. ६० टक्के जंगल संपत्तीच्या आधारे कागद, फर्निचर, डिंक, काथ वगैरे उद्‌योग निघू शकतात.

(४) महाराष्ट्र शासनाच्या विविध सहाय्यक संस्थांनी कागदी काम (कागदपत्रांचे काम) कमी करून कार्यालयातून उद्‌योगांच्या जवळ जावून त्यांना मार्गदर्शन करावे.

(५) कार्यकारी भांडवलाची व्यवस्था राष्ट्रीयीकृत बँका किंवा सहाय्यक संस्थांमार्फत करून द्‌यावी.

(६) कच्च्या मालाचा पुरवठा सातत्यपूर्वक असावा. दुरुपयोग करणाऱ्या उद्‌योगचालकांना पुढे हा पुरवठा बंद करावा.

(७) अस्तित्वात असलेल्या उद्‌योगांनी भविष्यकाळातील नवीन योजना आंखण्याकरिता संबंधित विभागांना मार्गदर्शन करावे.

(८) विदर्भ विकास महामंडळाने इतर योजना हाती न घेता प्रत्येक जिल्ह्यातील भूगर्भ व नैसर्गिक संपत्ती, मानवी बळाचा शोध घेऊन त्याप्रमाणे उद्‌योग स्थापनेला चालना द्‌यावी.

(९) जिल्हानिहाय खालीलप्रमाणे खनिज संपत्तीमोठ्या प्रमाणावर या विभागात आहे. या खनिजसंपत्तीचा उपयोग उद्‌योग स्थापनेकरिता करून घेता येईल.

(नागपूर–विदर्भ विभाग)

खनिजसंपत्ती	जिल्हा
(१) दगडी कोळसा	– नागपूर-चंद्रपूर-यवतमाळ. (१८६ दशलक्ष टन) (१६८ दशलक्ष टन).
(२) मँगनीज	– नागपूर, भंडारा. २४ कि. मीटर रुंद पट्टा.
(३) लोहखनिज	– चंद्रपूर (१८३ दशलक्ष टन) भंडारा.
(४) चुनखडी	– यवतमाळ (२८७५ दशलक्ष टन) चंद्रपूर (१०२६ दशलक्ष टन).
(५) डोलो मॉईट	– नागपूर-यवतमाळ (२०० दशलक्ष टन) चंद्रपूर.
(६) कायनाईट सिलीमिनाइट	– भंडारा–१९१ दशलक्ष टन.
(७) खेरीज क्रोमाईट	– (नागपूर-भंडारा).
(८) तांबे-खनिज	– (नागपूर-चंद्रपूर १३.८ दशलक्ष टन).
(९) अभ्रक	– (नागपूर-चंद्रपूर).
(१०) सोने	– (नागपूर जिल्ह्यात भिवापूर).
(११) बेराईट	– (चंद्रपूर आणि
(१२) प्लॅटीनम	– (भंडारा) इ. खनिजे या विभागात सापडू शकतील.

(संदर्भ–महाराष्ट्र शासन पुस्तिका–१९७१–७२)

नागपूर जिल्हा सोडल्यास इतरत्र विविध प्रकारच्या खनिज संपत्तीवर आधारित उद्‌योग स्थापन झालेले आढळून येत नाहीत. उद्‌योगाच्या स्थापनेकरिता लागणारी खनिजसंपत्ती विदर्भ विभागात मोठ्या प्रमाणावर अस्तित्वात असतानासुद्धा एकही लोखंड व पोलाद उद्‌योग या विभागात निघू नये ही गोष्ट महाराष्ट्राला खचितच भूषणावह नाही. लोखंड, पोलाद उद्‌योगाच्या काही घोषणा झाल्या आहेत. प्रत्यक्ष उत्पादनाला किती काळ लागेल कळत नाही.

(१०) वीज, पाणीपुरवठा, रस्ते, श्रमिकशक्ति, शीघ्र व स्वस्त दळणवळणाची साधने, कच्चा माल, बाजारपेठ, भांडवल, इतर सवलती उद्‌योगाना देण्याकरिता नागपूर विभागाच्या प्रत्येक जिल्ह्यात सरकारची संस्था असावी.

(११) औद्‌योगिक वसाहती स्थापन करण्यापेक्षा जे इच्छुक उद्‌योगचालक उद्‌योग काढण्याकरिता तयार आहेत. त्यांना सर्व प्रकारचे सहकार्य शासनाने द्‌यावे. सध्या नागपूर, अमरावती येथील उद्‌योगवसाहतीमध्ये अनेक गाळे खाली आहेत.

वरील विविध सूचना अंमलात आणल्यास त्याचा चांगला प्रभाव पडू शकेल असे वाटते. महाराष्ट्र राज्यात थोडासा औद्‌योगिक पट्टा (मुंबई-पुणे-ठाणे-नाशिक) सोडल्यास बराच मोठा भाग मागासलेला आहे. या विकसित विभागामुळे महाराष्ट्र औद्‌योगिक दृष्ट्या विकसित आहे हे म्हणणे चूक ठरणारे आहे.

मागास क्षेत्रांचा विकास म्हणजे लोकांचा विकास होय ! नागपूर विभागातील जनतेने स्वतःहून विकासाच्या कल्पना सरकारसमोर मांडल्या पाहिजेत. केवळ अधिकाधिक मंडळे आणि महामंडळे निर्माण करून विकास साधणार नाही. जनतेचे सहकार्य घ्यावे लागेल. नागपूर भागातील जनतेने आपल्याजवळ पडून असलेल्या भांडवलाचा उपयोग करून उद्‌योगस्थापनेचे प्रयत्न करावे आणि जुन्या परंपरागत रुढीतून मुक्त होवून विकासाच्या नवीन दालनात प्रवेश करावा.



हिरवा चारा जिथे मिळेल तिथे आपल्या मेंढरांचे कळप घेऊन मेंढपाळ हिंडत असतो, तर घरातील हातमागावर घोंगडी विणून चरितार्थ चालविणारा धनगर लोकरीसाठी मेंढपाळाचा शोध घेत असतो. चाऱ्यासाठी एकाचा संसार पाठीवर असतो तर तो चालावा म्हणून दुसरा या फिरत्या संसाराचा सतत मागोवा घेत असतो. असा चालतो हा मेंढपाळ-धनगरांचा संसार .....

चाऱ्यासाठी नी लोकरीसाठी मेंढपाळ

पहिल्या पावसानंतर हिरवा चारा सर्वत्र मुबलक प्रमाणात दिसू लागला तरी शेतीची कामे चालू झालेली असतात आणि जिथे शेती नाही अशाच जमिनीचा शोध घेऊन मेंढपाळ आपली मेंढरे आणि संसार घेऊन हिंडत असतात. हिवाळ्यात चाऱ्यापेक्षा जमिनीच्या मालकाची परवानगी अधिक महत्वाची असते तर उन्हाळ्यात चारा मिळेल तितक्या दूर जाणे त्यांना भाग पडत असते. मेंढीपासून वर्षातून दोनदा लोकर मिळते आणि या लोकरीपासून घरगुती मागावर घोंगडी विणणारी धनगर कुटुंबे मेंढपाळांचा शोध घेत असतात. धुळे जिल्ह्यात चाळीस हजारावर मेंढरे असून निझामपूर जैताने, सोनगीर आणि मानपूर या गावातून एकूण सुमारे चारशे धनगर कुटुंबाकडे घोंगडी तयार करण्याचे हातमाग आहेत. दरवर्षी आषाढ-श्रावणात मिळणाऱ्या लोकरीसाठी या धनगर कुटुंबांना मेंढपाळांच्या शोधासाठी अधिक दूर जावे लागत नसले तरी पौष-माघात मिळणाऱ्या लोकरीसाठी मात्र बऱ्हाणपूर-इंदौर सारख्या दूरच्या भागात मेंढपाळांच्याही मागे त्यांना जावे लागते.

पाठीवर संसार


मेंढरे पाळणे हाच परंपरागत व्यवसाय असणारी धनगर कुटुंबे भटक्या जमातीतील असतात. मेंढरें हीच त्यांची संपत्ती आणि चरितार्थाचे एकमेव साधन असते. संगोपन आणि संवर्धन हाच त्यांचा उद्योग असल्यामुळे मालकीची जमीन सहसा त्यांच्याकडे असत नाही. वीस मेंढ्यांच्या कळपाला ते एक खंडी म्हणतात. अशा दहा खंडी मेंढरांची (दोनशे मेंढरे) देखभाल एक मेंढपाळ करू शकतो. नुकत्याच जन्मलेल्या पिल्लाच्या अंगावर काढता येण्यासारखी लोकर सहा महिन्यात वाढते. सर्वसामान्यपणे मेंढरांची जोपासना ते सात-आठ वर्षेपर्यंत करतात. त्यानंतर मेंढरांचे दात पडणे, रोगराई इत्यादीमुळे आठ वर्षापलीकडे त्यांचे पालन करणे लाभदायक ठरत नाही. शंभर मेंढरांच्या कळपात फक्त दहा नर प्रजोत्पादनासाठी ठेऊन बाकीचे नर ते विकून टाकतात. वर्षातून दोन वेळा एका मेंढरापासून पिल्ले मिळतात. क्वचित प्रसंगी एकाच वेळी दोन पिल्लेही मिळतात. नवीन पिल्लापासून तिसऱ्या वर्षात प्रजननास सुरुवात होते. आपआपली मेंढरे घेऊन एका जागेतून दुसरीकडे हिंडताना साधारणतः पाच-दहा कुटुंबे एकाच माळरानावर झोपड्या टाकून वस्ती करतात आणि त्या परिसरातील चारा संपला की मेंढरांबरोबरच आपली वस्तीही दुसरीकडे हलवितात. काही ठिकाणी चराई करण्यासाठी त्यांना जमिनीच्या मालकांना पैसे द्यावे लागतात. तर काही वेळा मेंढ्यांच्या मलमूत्रापासून जमिनीला चांगले खत मिळते म्हणून शेतकरी मेंढ्या आपल्या शेतात बसविण्याचे पैसे मेंढपाळांना देतात.

लोकरीसाठीही पायपीट

मेंढरांच्या लोकरीपासून हातमागावर घोंगडी तयार करण्याचा व्यवसाय पत्करून काही धनगर कुटुंबे लहान-लहान गावातून कायम स्वरूपात स्थायिक झाली आहेत. अशा कुटुंबांना लागणाऱ्या लोकरीसाठी फिरत्या मेंढपाळांच्या शोधावर असावे लागते. मेंढ्यांची लोकर कापून घेण्याचे कामही याच धनगरांना करावे लागते. शंभर मेंढरांची लोकर काढण्यासाठी पन्नास ते पाऊणशे रुपये त्यांना मेंढपाळाला द्यावे लागतात. शंभर मेंढरांपासून सुमारे वीस किलो लोकर मिळते. एक धनगर दिवसभरात पन्नास मेंढरांची लोकर काढू शकतो. लोकरीपासून सूत काढण्याचे काम बहुधा कुटुंबातील महिला हातचरख्यावर करते. दिवसभरात ती चरख्यावर एक किलो सूत तयार करू शकते. प्रत्यक्ष मागावरील विणकामापूर्वी सुताला खळ लावून आवश्यकतेनुसार रंगविण्यांत येते. सहा फूट लांब व चार फूट रुंदीचे एक घोंगडे एका धनगराला हातमागावर पूर्ण करता येते. विणकाम करीत असताना तो हवे ते नक्षीकाम करीत असतो. हातमागाची आधुनिक सुधारणा, आवश्यक ते अद्यावत ज्ञान व यांत्रिक सहाय्याच्या अभावामुळे तयार झालेला माल हवा तितका सफाईदार व उच्च दर्जाचा नसल्यामुळे विक्रीसाठी तो माल लहान-मोठ्या बाजारपेठात जाऊन धनगराला विकावा लागतो. त्यामुळे पंधरा रुपयापेक्षा अधिक किंमत एका घोंगडीला मिळू शकत नाही.



लोकरीपासून अत्यंत उबदार घोंगडी तयार केली जात आहे. घोंगड्याना चांगला भाव येण्यासाठी या व्यवसायात आधुनिक तंत्राचा अवलंब आवश्यक आहे.



मेंढराच्या अंगावर काढता येण्यासारखी लोकर दर सहा महिन्यांनी वाढते. सात-आठ वर्षेपर्यंत अशा प्रकारे लोकर काढली जाते.

लोकर गिरण्यांकडून मागणी

गावांत स्थायिक झालेल्या धनगर कुटुंबांना शेतीची आणि इतर लहान-लहान कामे मिळत असल्यामुळे आषाढ-श्रावणात ते जी लोकर काढून आणतात तिचा प्रत्यक्ष मागावर उपयोग न करता ती व्यापाऱ्यामार्फत विकून टाकतात. मुंबईतील उनी कापडाच्या मिलतर्फ आषाढातील लोकर खरेदी करण्यात येते. कारण पौष-माघात जंगलातील काटे वाळून जातात आणि ते मेंढ्यांच्या लोकरीत अडकून बसतात त्यामुळे त्यावेळी काढलेली लोकर मिलला उपयोगी पडत नाही. पौष माघात गावांत इतरत्र कामे नसल्यामुळे धनगर कुटुंबे या लोकरीचा उपयोग आपल्या मागावरच मोठ्या प्रमाणात करीत असतात. दरवर्षी लोकर कुणी कुणाला द्यायची हे मेंढपाळ आणि धनगर कुटुंबात ठरलेले असले तरी मेंढपाळ चाऱ्यासाठी कुठे गेले आहेत याचा शोध घेऊन लोकर काढण्याच्या वेळी धनगराला तिथे पोहोचावेच लागते. चरितार्थासाठी दोघेहि एकमेकावर अवलंबून असले तरी एकाचा संसार सतत त्याच्या पाठीवर असल्यामुळे दुसऱ्याला त्याच्या शोधात फिरणे क्रमप्राप्त होत असते. असा चालतो हा मेंढपाळ-धनगरांचा ऊन-पावसाचा संसार !

जागतिक मंदीची लाट येणार असा कित्येक अर्थतज्ज्ञ आणि अर्थशास्त्रविषयक संशोधन संस्था गेल्या वर्षभरात ारखा अंदाज वर्तवीत आहेत. अमेरिकेतील पेन्सिल्व्हानिया विद्यापीठातील 'व्हॉरटन स्कूल इकॉनॉमिक फोरकॉस्टिंग ीम'च्या मते, जागतिक अर्थव्यवस्थेत १९५८ नंतर प्रथमच मंदीची चिन्हें दिसून येत आहेत. एकूण परिस्थितीचा सम्यक् आढावा घेतल्यास वाटते ही खरोखरीच मंदीची चाहूल आहे की वृथा हाकाटी आहे ?

० ० ० ०

मंदीची चाहूल की हाकाटी?

—सुभाष सोनवणे

मंदीची झळ बसून अमेरिकेतील बेकारांची संख्या ४० लाखावरून १ कोटी ४० लाखावर जाईल असा अमेरिकेच्या व्यापार ात्याचा अंदाज आहे. पश्चिम जर्मनीत डिसेंबर १९७३ मध्ये ४ लाख ५७ हजार बेकार होते. कांही महिन्यातच हा आकडा १० लाखाच्या रात जाईल असा अंदाज प. जर्मनीतील बर्लिन, हँबर्ग, म्युनिच, कोएल व एस्सेन या ठिकाणच्या ५ अग्रगण्य अर्थशास्त्रीय संशोधन करणाऱ्या संस्थांनी आपल्या संयुक्त अहवालात व्यक्त केला आहे.

पश्चिम जर्मनीच्या सरकारने या परिस्थितीची दखल गेल्या र्षाच्या अखेरीसच घेतली. अरब व आशियाई कामगारांचा प. र्मनीत येणारा लोंढा थोपविण्यात आला. प. जर्मनीत २० लाख अरब व आशियाई कामगार आहेत. त्यांच्यावर बेकारीची कुऱ्हाड व देशत्यागाची आपत्ती केव्हाही कोसळू शकते. प. जर्मनीतील मोटर तयार करणाऱ्या कारखान्यांमध्ये व कापड गिरण्यात कामगारांना ले-ऑफ देण्यास कधीच सुरुवात झालेली आहे.

विकसनशील देशांची स्थिती

विकसित व विकसनशील देशांमधील विकास व उत्पादनवाढ खुंटली असून त्याचवेळी चलनवाढीच्या भस्मासुराने चांगलेच भेडसावले आहे. अर्थशास्त्रात या अशा परिस्थितीस Stagflation असे म्हणतात. उण्यापुऱ्या वर्षदीडवर्षात तेलाच्या किंमती चौपट वाढल्या. यामुळे केवळ इंधन व वाहतुकीचाच खर्च वाढला असे नाही तर तेलावर आधारित अशा प्लॅस्टिक्स व पेट्रोकेमिकल्स या वस्तूंचा उत्पादनखर्च वाढला. निरनिराळ्या प्रकारचे धातु (Metals), कागद, काच व अशा बऱ्याच वस्तूंच्या टंचाईने महागाई कडाडण्यास हातभार लावला. कामगार संघटनांच्या संघटित दडपणामुळे वेतन-रोजंदारी ात वाढ करावी लागत आहे. याखेरीज तेल बचतीसाठी जहाज वाहतुकीत झालेली कपात व कच्चा माल नी धान्य यांच्या जागतिक व्यापारातील मंद हालचाली यामुळे मंदीची धारणा बळकट होण्यास काहीसा हातभार लागला आहे.

उत्पादनवाढ खुंटून महागाई जेव्हां कडाडते तेव्हां उपरीनिर्दीष्ट सर्व कारणे त्या परिस्थितीस आपल्या परीने हातभार लावतात. परिणामी वस्तूंचा उत्पादन खर्च वाढतो व वस्तूंच्या किंमती कडाडतात. सार्वत्रिक स्वरूपाची भाववाढ सुरू झाली की लोकांच्या हातात असलेल्या पैशाची क्रयशक्ती वेगाने घसरते. मग जीवनार्थ कलहात सर्वसामान्य माणसे-ुद्धा जीवनावश्यकतेनुसार आपल्या खरेदीचे अग्रक्रम ठरवतात. अनेक वस्तूंच्या वापरास त्यांना फाटा द्यावा लागतो. विकसनशील देशात उत्पन्नाच्या ६० टक्के एवढा खर्च अन्नधान्य आदी जीवनावश्यक वस्तूंवर होत असतो. ही वस्तुस्थिती लक्षात घेता, सर्वसामान्य माणसांची या विशिष्ट परिस्थितीत कांही वस्तूंना मागणी कमी होते, तर कांही वस्तूंची खरेदी ते साफ थांबवितात. मग बाजारात या वस्तूंचे साठे पडून राहतात.

भाववाढ : मागणी कमी

त्यामुळे विक्रेत्याचा पैसा त्या मालात अडकून पडतो. तो संबंधित कारखान्यांकडे नवी मागणी करीत नाही. त्यामुळे त्या कारखान्यात मालाचे गठ्ठे पडून राहतात. खेळते भांडवल अडकवून मालाच्या केवळ राशी लावणे कोणत्याही कारखानदाराला फार काळ परवडणारे असते. मग तो ले-ऑफ, कारखान्याच्या एक-दोन पाळ्या बंद करणे, कांही विभाग बंद करणे या मार्गाचा अवलंब करून प्रतिकूल परिस्थितीशी झगडण्याचा प्रयत्न करतो. तीं परिस्थिती हाताबाहेर जात आहे असे बघून मग तो कारखाने, गिरण्या बंद करतो.

साहजिकच हजारो कामगार बेकार होतात. त्यामुळे त्यांची क्रयशक्ती कमी होऊन कांही दिवसांनी त्यांची विविध वस्तूंना असलेली मागणी कमी होते. नी मग ही मंदीची परिस्थिती आणखी चिघळते.

जागतिक मंदीचा इशारा

'आंतरराष्ट्रीय नाणे निधी'ने या वर्षाच्या आपल्या अहवालात जागतिक मंदीचा इशारा दिला आहे. चलनांच्या अवमूल्यनाची चढाओढ व व्यापारावरील निर्बंधात्मक धोरणामुळे जागतिक मंदी येईल असे नाणे निधीने आपल्या अहवालात म्हटले आहे.

निराशाजनक अंदाजाच्या या कोलाहलात, गलबल्यात एक अशावादी सूर निघाला आहे. नी हा सूर या लेखाच्या सुरुवातीसा उल्लेखिलेल्या जर्मनीच्या पाच अग्रगण्य अर्थशास्त्रीय संशोधन संस्थांनी काढला आहे. या संस्थांच्या संयुक्त अहवालात म्हटले आहे की, आयात-निर्यात व्यापारात बरीच तूट असलेल्या देशांनी आयात होणाऱ्या मालावरील निर्बंधात्मक जकाती आणखी जाचक केल्या नाहीत तर पुढील वर्षी जागतिक मंदीचा धोका टळेल.

या पाच संशोधन संस्थांचा अंदाज खरे ठरण्याबाबतचा पूर्वलौकिक चांगला आहे. भाववाढीपेक्षा अधिक दूरगामी परिणामाच्या प्रसंगी

राज्यव्यवस्थेस धोका निर्माण करण्याची क्षमता असलेल्या मंदीचा धोका टाळावा असेच कुणालाही वाटेल.

अरब देशांचा 'लढाऊ' पवित्रा

परंतु जागतिक वस्तुस्थिती लक्षात घेता, मनात पाल चुकचुकते. केवळ विकसनशील देशांमधीलच राष्ट्रवादाची प्रवृत्ती वाढत आहे असे नाही तर अमेरिका, प. जर्मनी, कॅनडा, जपान आदी विकसित देशांमध्येही ही प्रवृत्ती अलीकडे जोराने उफाळून आली आहे. युरोपीय सामायिक बाजारपेठेत थोड्या व्यापक प्रमाणावर ही प्रवृत्ती आहे. तेल उत्पादक अरब देशांनी गेल्या वर्षापासून व्यापारी दृष्टचा लढाऊ पवित्रा घेतला व या परिस्थितीचा ते पुरेपूर फायदा उठवीत आहेत. विकसनशील देशांमधून आयात केलेल्या मालास विकसित देश वाजवी किंमती देत नाहीत व विकसनशील देशांनी आयात केलेल्या माला-बद्दल मात्र ते चढा भाव आकारतात. या दुहेरी शोषणाची तीव्र जाणीव विकसनशील देशांना झाली आहे. संघटित तेल उत्पादक अरब देशापुढे हे शोषक विकसित देश नांगी टाकतात हे एव्हांशी इतर विकसन-शील देशांच्या नीट लक्षात आले आहे. म्हणून चहा, ताग, कच्चे लोखंड आदी मालाची निर्यात करणारे कांही प्रमुख देश संघटित होऊन आपल्या मालास चांगला भाव मिळविण्याच्या प्रयत्नास लागले आहेत. भारताने याकामी पुढाकार घेतला आहे.

मंदी टाळण्यासाठी खुला व्यापार ?

सबंध जगभर खुल्या व्यापारास अधिकाधिक प्रतिकूल परिस्थिती होत चालली आहे. ही धारणा कमी होण्याऐवजी वाढण्याची चिन्हें अधिक आहेत. अशा परिस्थितीत प. जर्मनीच्या ५ अर्थशास्त्रीय संस्थांचा जागतिक मंदी टाळण्यासंबंधीचा अंदाज खोटा ठरण्याची शक्यता आहे.

सर्वच घटक आपल्या काबूत, नियंत्रणाखाली नसल्याने अर्थ-शास्त्रात विशेषतः अंदाज वर्तवितांना–ठामपणे कांही सांगणे शक्य व योग्य नसते. मंदीची चाहूल लागली असली तरी ती तीव्र, उग्र वा सर्वाधिक स्वरूपाची असेलच असे आज हमखास सांगता येणार नाही. आर्थिक परिस्थिती ही असंख्य व अज्ञात पण त्याचबरोबर गुंतागुंतीच्या अशा घटकांनी बनत असते. त्यामुळे आर्थिक परिस्थितीचे अचूक निदान करणे हे सहज सोपे असे काम नसते.

मिनी–तेजी

अमेरिकेच्या पश्चिम भागात रणगाडा उद्योगधंद्यातील बरेच कारखाने आहेत. अमेरिकन अर्थव्यवस्थेत मंदीची लक्षणें दृग्गोचर होत असताना, रणगाड्याचे हे कारखाने व जनरल मोटर्सच्या कार-खान्यात उत्पादनास उधाण आले आहे. या कारखान्यांमध्ये 'मिनी-तेजी' दिसते असे 'खिश्चन सायन्स मॉनिटर' या नियतकालिकाने म्हटले आहे.

जागतिक अर्थव्यवस्था 'खुंटित उत्पादनवाढ व चलनवाढीच्या' Stagflation अवस्थेतून 'मंदी व चलनवाढीच्या' अवस्थेकडे Slumpflation जात आहे, असे म्हटले जाते. मंदीची लाट सार्वत्रिक होईपर्यंत काही उद्योगधंद्यांमध्ये तेजी असू शकते. वरकरणी विचित्र, विसंगत व अपवादात्मक असे तेजीचे वातावरण वाटत असले तरी ते तसे नसते, तसे मानण्याचे काही कारण नाही.

देशाची वाटचाल मंदीकडे ?

भारतातही मंदीची लक्षणें दिसू लागण्याच्या तक्रारी कांही उद्योगधंद्यांच्या चालकांनी केल्या आहेत. या तक्रारींविषयी लेखाच्या पुढील भागात साधकबाधक चर्चा करण्याचा माझा मानस आहे. जी लक्षणें दिसतात ती मंदीचीच आहेत काय हे उद्योगपतींनी व सरकारने प्रथम ठरवावे. 'लांडगा आला रे आला' या वृत्तीने मंदीविषयी उद्योग-पतींनी उगाच काहूर व आवई उठविणे जसे योग्य नाही, तसेच मंदीची लक्षणे दिसत असल्यास ती कबूल करायची नाहीत व परिस्थिती अधिक बिकट झाल्यावर घायकुतीस येऊन मग मंदीविरोधी उपाययोजना करणेही तितकेच अयोग्य होय !

मंदीची लाट येऊन ती सार्वत्रिक स्वरूपाची झाली की त्यामधून सावरण्यास किमान ३-४ वर्षे लागतात असा अनुभव आहे. आपल्या देशात मागची मंदी १९६६-६७ मध्ये आली आणि या धक्क्यामधून डोके वर काढीपर्यंत १९६९-७० साल उजाडले. मागच्या मंदीची आपल्या अर्थव्यवस्थेस जी झळ बसली ती आधी लक्षात घेऊन त्या पार्श्वभूमीवर विद्यमान परिस्थितीविषयी पुरेश्या गांभीर्याने विचार करणे उचित ठरेल.

मागील मंदीची झळ

सन १९६१-६२ मध्ये व्यक्तिगत बचत ही राष्ट्रीय उत्पन्नाच्या अदमासे ९.५ टक्के एवढी होती. बचतीचे हे प्रमाण १९६६-६७ य मंदीच्या वर्षी ६ टक्क्यांवर आले अशी रिझर्व्ह बँकेची आकडेवार आहे. आपल्या देशात नियोजनपूर्व काळात व्यक्तिगत बचतीचे प्रमाण एवढे होते.

देशात आलेली मागची मंदी ही सार्वत्रिक स्वरूपाची नव्हती. त वाहतूक, अवजड यांत्रिकी माल, मोटर, मशिन टूल्स, स्ट्रक्चरल इंजि निअरिंग, फॅब्रिकेशन व कापड या उद्योगधंद्यांना मुख्यत्वे मंदीच फटका बसला होता.

मागच्या मंदीच्या काळात महाराष्ट्रातील ९ हजार कामगारांन ले-ऑफ दिला गेला वा त्यांना नोकरीतून कमी करण्यात आले. त प. बंगालातील इंजिनिअरिंगच्या कारखान्यातील २३ हजार काम गारांवर ले-ऑफची आपत्ती आली होती.

मंदीमुळे १९६६ व १९६७ मध्ये औद्योगिक उत्पादन घसरले १९६८ मध्ये त्यात काहीशी सुधारणा झाली. १९६९ पासून औद्योगिक उत्पादन ८ ते ९ टक्क्यांनी वाढू लागले. मंदीपूर्वी १९६१ ते १९६ या काळात औद्योगिक उत्पादनवाढीचा हा वेग होता. मागच्या मंदी काही परिणाम लक्षात घेतले. आता विद्यमान परिस्थितीविषय विचार करू.

देशातील मंदीचे स्वरूप

रेल्वेने मागणीत कपात केल्यामुळे वाघिणी (Wagons) तया करणाऱ्या कारखान्यांना मंदीच्या परिस्थितीशी तोंड देण्याचा प्रसं आला आहे, असे या उद्योगधंद्यांच्या चालकांचे मत आहे. रेल्वेचं

आर्थिक परिस्थिती चिंताजनक असल्याने त्यांनी मागणीत कपात करणे क्रमप्राप्त होते. तसेच पूर्वीच्या मागणीएवढा वाघिणींचा पुरवठा या उद्योगधंद्यांकडून रेल्वेस अद्याप झालेला नाही व तो तसा होण्याची शक्यताही दिसत नाही. अशाही परिस्थितीत मंदीची आवई उठवून रेल्वेकडून वाघिणींची नवी मागणी मिळविणे व पूर्वी पुरविलेल्या वाघिणींच्या किंमतीविषयी वाटाघाटी पुन्हा सुरू करण्याचा प्रयत्न या उद्योगधंद्यांचे चालक करीत असल्याचे, रेल्वे खात्याचे म्हणणे आहे. नी यात बरेच तथ्य दिसते.

मशीन टूल्स, कापड गिरण्या, अवजड यांत्रिकी कारखाने, टिकाऊ स्वरूपाच्या ग्राहकोपयोगी वस्तू तयार करणारे उद्योगधंदे, पंजाबातील विटा तयार करणारे लघु उद्योगधंदे, बांधकाम व्यवसाय आदी उद्योगधंद्यांमध्ये मंदीची चिन्हें दिसू लागल्याच्या तक्रारी वर्तमानपत्रातून येऊ लागल्या आहेत. त्याखेरीज उद्योगधंद्यांच्या संघटनांनी वार्ताहर परिषद, संबंधित मंत्र्यांना निवेदन सादर करणे याही मार्गाचा यासाठी अवलंब करण्यास सुरुवात केली आहे.

देशात कच्च्या मालाची तीव्र टंचाई बऱ्याच उद्योगधंद्यांना भेडसावत आहे. पण त्याचवेळी स्टेट ट्रेडिंग कॉर्पोरेशनकडे आयात केलेल्या कच्च्या मालाचा प्रचंड साठा पडून असल्याचे वृत्त आहे.

याला काय मंदी म्हणावी ?



वाढत्या महागाईमुळे गरजेच्या वस्तूंचा अग्रक्रम ठरविणे आता ग्राहकांना आवश्यक झाले आहे.

कापड, तांदूळ, गहू, खाद्यतेले, कपास, साखर, माईल्ड स्टील, सिमेंट, कागद व रसायने आदी वस्तूंचे भाव अलिकडे उतरू लागले आहेत. मंदीची हाकाटी करणारे या वस्तुस्थितीकडे लक्ष वेधतात. स्मगलर्स व साठेबाजांविरुद्ध सरकारने सुरू केलेल्या देशव्यापी, खंबीर अशा मोहिमेमुळे वस्तूंचे भाव उतरण्यास सुरुवात झाली, हा सरकारी गोटाचा दावा ते मान्य करीत नाहीत. त्यांचे प्रतिपादन असे असते की, या मोहिमेमुळे चोरटचा आयातीचे प्रमाण कमी झाले असले तर किमान कांही ग्राहकोपयोगी वस्तूंचे भाव वाढायला हवे होते. कारण चोरटचा आयातीचा माल कमी उपलब्ध होऊन देशातील मालावर मागणीचा ताण पडायला हवा होता.

ऑक्टोबरच्या सुरुवातीस नवे धान्य बाजारात येऊ लागते. तेव्हा व्यापारी साहजिकच धान्याचे मागचे साठे विक्रीस काढतो. त्यामुळे या काळात धान्याचे भाव उतरणे हा नेहमीचा अनुभव आहे, हे या संदर्भात विसरता येणार नाही.

परंतु गेल्या २-३ महिन्यात मंदीने चोरटचा पावलाने अर्थव्यवस्थेत प्रवेश केल्याने वस्तूंचे भाव उतरत आहेत असे ठासून सांगणारे कांही अर्थविषयक स्तंभलेखक आहेत. मंदीसंबंधी आकडेवारीचा पुरावा उपलब्ध नाही असे म्हणणारे एकाच दमात काळ्या बाजारात पोलादाच्या किंमती १२ टक्क्यांनी, सिमेंटची किंमत खुल्या बाजारात २५ टक्क्यांनी, पितळ व ब्रास स्क्रॅप्सच्या किंमती ५० टक्क्यांनी व यांत्रिकी वस्तुंच्या किंमती २५ टक्क्यांनी उतरल्या एवढी आकडेवारी मोठचा उत्साहाने फेकतात. नी या वस्तूंच्या किंमती एवढचा खाली येऊनही मालास ग्राहकांकडून मागणी नाही, असा व्यथेचा सूर ते लावतात.

मागणी मंदावली नाही

कापड गिरण्यांनी भावात ५ ते ४० टक्के कपात केली तरी मालास उठाव नाही अशी तक्रार गिरणी मालक व त्यांचे संघ करीत आहेत. कापडाचे साठे पडून राहत असल्यामुळे तिसरी पाळी बंद करणे, कांही विभाग बंद करणे व आता दुसरीही पाळी बंद करण्यास गुजरातमधील गिरणीमालकांनी सुरुवात केली आहे.

या संदर्भात मागणी मंदावल्याची हाकाटी सरकारला मान्य नाही. गेल्या २ वर्षात कापडाचे भाव सारखे वाढवून कापड गिरण्यांच्या चालकांनी रग्गड नफा कमावला. महागाईची सार्वत्रिक झळ बसल्याने जनतेची क्रयशक्ती बरीच रोडावली. त्यामुळे त्यांना आपल्या गरजेच्या वस्तूंचा अग्रक्रम ठरविणे भाग पडले आहे. परिणामी ग्राहक प्रतिकार अनुभवास येऊ लागला.

कापड गिरण्यांच्या चालकांना कापडाच्या किंमतीमध्ये तोशीस न लागता २५ टक्के कपात करणे शक्य आहे, असे मत टेक्स्टाईल कमिशनरनी व्यक्त केले आहे. नी 'तसे होत नाही तर सरकारला कापडाचे पडून राहिलेले साठे ताब्यात घेण्याविषयी विचार करावा लागेल', असा इशाराही त्यांनी दिला आहे. "वाजवी भावास मागणी मंदावलेली नाही" असे रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर श्री. जगन्नाथन् यांनी नुकतेच वार्ताहर परिषदेत सांगितले आहे.

पुण्याने धडा शिकविला

पुण्याच्या जनतेने श्री. जगन्नाथन् यांच्या या म्हणण्यास पुष्टी दिली आहे. पुण्यात युवक महामंडळाने 'जनता ग्राहक संघ' स्थापून महाराष्ट्रातील व्यापक प्रमाणावरील व सक्रिय अशा ग्राहक चळवळीचा शुभारंभ केला आहे. जनतेने यास चांगला प्रतिसाद दिलेला बघून त्यांनी 'जनता कापड पेठ'ही सुरू केली. या पेठेत पहिल्या २ दिवसात एक लाख रुपयापेक्षा अधिक किंमतीच्या कापडाची विक्री झाली.

व्यापाऱ्यांचा हिशोब चुकला

दसरा-दिवाळीचे सण तोंडाशी आल्यानंतरसुद्धा आपल्या मालास उठाव नाही याविषयी सर्चित असलेले कापड दुकानदार कोठे व जनता कापड पेठेत झुंबड उडते हे दृश्य कोठे ? याचा अर्थ काय लावायचा ? अर्थ स्पष्ट आहे. कापड दुकानदारांना नफ्याच्या प्रमाणात कपात व्हायला नको आहे. सण तोंडाशी आल्यावर चढ्या भावातसुद्धा कापड खरेदी करण्यास ग्राहक आपसूक येईल असे कापड दुकानदारांना वाटले. कित्येक वर्षाच्या अनुभवावर आधारलेला हा हिशोब चुकण्यास सुरुवात झाली आहे. कारण निर्धारी बनायलाच हवे अशा परिस्थितीस तोंड देण्याची पाळी ग्राहकावर आलेली आहे.


मागणी मंदावल्याच्या सार्वत्रिक हाकाटीसंबंधात सरकारने परिस्थितीचे मूल्यमापन केले आहे. त्यानुसार लघु उद्योगांच्या

उत्पादनातील कपात ही मागणी मंदावल्यामुळे नाही, तर विजेची तीव्र टंचाई, बँकांकडून होणाऱ्या कर्जपुरवठ्यावरील कडक निर्बंध यामुळे आहेत.

मंदीची झळ प्रथम भांडवली मालाच्या वस्तू तयार करणाऱ्या उद्‌योगधंद्‌यांना बसते. या उद्‌योगधंद्‌यांत सिमेंट, कापड व साखर कारखान्यासाठी लागणारी यंत्रसामुग्री तयार करणारे कारखाने येतात. या कारखान्यांकडे हल्ली पुढील २० ते २५ महिन्याच्या मालाची मागणी नेहमीप्रमाणे ऑर्डरबुक मध्ये नोंदविलेली आहे. मशिन टूलसच्या मंदावलेल्या मागणीबाबत बोलायचे तर गेली २ वर्षे तशी परिस्थिती आहे. **ग्राहकोपयोगी वस्तू तयार करणाऱ्या एकाही उद्‌योगधंद्‌यामध्ये मंदीची चिन्हे दिसत नाहीत, असे सरकारी मूल्यमापन आहे.**

कर्जास मागणी कमी नाही

आणखी एक महत्वाचा मुद्‌दा म्हणजे मंदीची लक्षणे जर खरी असती तर उद्‌योगधंद्‌यांच्या चालकांची बँकांकडील कर्जाची मागणी कमी व्हायला हवी होती. तसे अद्‌याप झालेले नाही.



उद्योगधंद्याच्या चालकांची कर्जाची मागणी कमी व्हावयास हवी होती पण अद्याप तसे झालेले दिसत नाही.

अवजड यांत्रिकी उद्‌योगधंद्‌यातील मागणी मंदावल्याचे प्रतिपादनही कांही खरे नाही, असे सांगितले जाते. या उद्‌योगधंद्‌याकडून उद्‌योजकांना (Entrepreneur) यंत्रसामुग्रीचा पुरवठा होण्यास एवढी दिरंगाई होत आहे की या यंत्रसामुग्रीची आयात करण्याची परवानगी द्या अशी विनंती उद्‌योजक सरकारला करीत आहेत.

मात्र चलनवाढ रोखण्यासाठी सार्वजनिक इमारतींचे बांधकाम करण्यास केंद्र सरकारने मनाई केल्याचा विपरीत परिणाम झाल्याशिवाय राहणार नाही. या मनाई आदेशामुळे एकूण गुंतवणुकीच्या ४० टक्क्यांपेक्षा अधिक गुंतवणुकीत कपात होईल. त्यामुळे हजारो कामगार बेकार होण्याचा धोका आहेच. तसेच जवळ जवळ दुष्काळी अशा हल्लीच्या वर्षी शेतमजुरांचे हमखास व सहज रोजगारीचे साधन यामुळे गेले आहे.

सब्सिडी व इतर प्रोत्साहनात्मक सवलतींची खैरात आणि विदेशी मालास देशी मालाशी स्पर्धा करता येऊ नये असे निर्बंधात्मक कवच असलेल्या Insulated भारतीय अर्थव्यवस्थेत मागणी मंदावण्याची शक्यता नाही.

कर्जपुरवठा निर्बंधांचा प्रतिकूल परिणाम नाही

बँकांनी करावयाच्या कर्जपुरवठ्यावरील निर्बंधाचा कापड गिरण्यांसहित कोणत्याही उद्‌योगधंद्‌यांवर प्रतिकूल परिणाम झालेला नाही. उलट कर्जपुरवठ्यासंबंधीच्या नोंदीत बनवाबनवी (Supply Manipulations of Funds) व बँकांकडून घेतलेल्या कर्जाचा इतर कामासाठी वापर केल्याचे नजरेस आले आहे, असे रिझर्व्ह बँकेचे डेप्युटी गव्हर्नर डॉ. आर. के. हझारी यांनी वार्ताहर परिषदेत सांगितले.

कापड, सिमेंट, साखर, कागद, टिकाऊ ग्राहकोपयोगी वस्तू तयार करणारे कारखाने व इतर बऱ्याच उद्‌योगधंद्‌यांनी टंचाईचा पुरेपूर फायदा उठविण्यासाठी भाववाढीच्या परिस्थितीत सरकारकडून येन केन प्रकारेण किमतीवरील संपूर्ण नियंत्रण उठविण्यात वा ते अंशतः उठविण्यात यश मिळविले आहे. जास्तीत जास्त नफा मिळवून देणाऱ्या या परिस्थितीमुळे आपल्या उत्पादनक्षमतेचा जास्तीत जास्त वापर करण्याचा व नवी उत्पादनक्षमता निर्माण करण्यासाठी नफ्याचा कांही भाग गुंतवायचा हा विचारसुद्धा या उद्‌योगधंद्‌यांतील उद्‌योगपतींना सुचलेला नाही. तर तो कृतीत येणे दूरच राहिले ! टंचाईतील आपले हितसंबंध जोपासण्यासाठी टंचाई टिकविली पाहिजे अशी प्रवृत्ती त्यामुळे उद्‌योगपतींमध्ये दिसून येते. सरकारी वित्तीय संस्था व व्यापारी बँका यांच्याकडून मिळणाऱ्या कर्जाचा वापर उत्पादक कार्यासाठी व गुंतवणुकीसाठी करण्याऐवजी साठेबाजीसाठी करण्याची प्रवृत्ती यामुळेच दिसून येते.

कर्जपुरवठानिर्बंध व ग्राहक प्रतिकार यांचा चिमटा आता जाणवू लागल्यामुळे मंदीची हाकाटी सुरू दिसते. अशा परिस्थितीत सरकारने आपले धोरण नरमाईचे केले तर उद्‌योगपतींच्या उत्पादनवाढविरोधी व साठेबाज प्रवृत्तीस पुन्हा चालना मिळेल. सुदैवाने सरकारी धोरण आज तरी खंबीर आहे. कर्जपुरवठा निर्बंध शिथिल होणार नाही हे रिझर्व्ह बँकेने स्पष्ट केले आहेच.

ग्राहक प्रतिकाराचा चिमटा

तथाकथित मागणी मंदावल्याच्या गाऱ्हाण्याचा अर्थ एवढाच की व्यापारी व उद्‌योगपती यांना काळ्या बाजारात वस्तू व सेवा विकण्यावर मिळणाऱ्या नफ्याच्या प्रमाणात कपात झालेली आहे. त्यामुळे परवान्यापेक्षा अधिक चोरटे उत्पादन पूर्वीपेक्षा कमी फायद्‌याचे झाले आहे. त्यामुळेच काळ्या बाजारातील चढ्या भावात कच्च्या मालास व अर्ध-पक्क्या (Intermediate Goods) मालास मागणी कमी झालेली आहे. काळ्या बाजारात चढ्या भावात खरेदी केलेल्या ह्या मालावर रगड नफा कमावणे शक्य राहिलेले नसल्यामुळे या मालापासून पक्का माल बनविण्याऐवजी सटोड्‌या व्यवहारासाठी या मालाचा वापर केला जातो. त्यामुळे कच्च्या मालाची तीव्र टंचाई कायम आहे.

चोरटे बेकायदेशीर उत्पादन

काळ्या बाजारात खरेदी केलेला सर्व कच्चा व अर्धपक्का माल उत्पादनासाठी वापरला तर हे उत्पादन कायदेशीर असू शकत नाही. कारण हे उत्पादन सरकारने दिलेल्या संमतीपेक्षा अधिक उत्पादन आहे. त्यामुळेच खुल्या बाजारात हा माल विकणे शक्य नाही. तेव्हा कागदोपत्री न मिळणारे व बेकायदेशीर असे उत्पादन आणि काळ्या बाजारातील व्यवहारात नफा घटत चालल्यामुळे बऱ्याच उद्‌योगपतींनी व व्यापाऱ्यांनी मंदीची जोरात आवई उठविली आहे. चोरटे व बेकायदेशीर उत्पादन (कर चुकविलेले, नोंद न झालेले) हे देशातील एकूण उत्पादनाच्या २५ टक्के आहे, असा एक अंदाज आहे. देशात तथाकथित पर्यायी अर्थव्यवस्था धुमाकूळ घालीत आहे याचा खरा अर्थ व गांभीर्य यात आहे.

(पान १७ पहा)

ग्रामीण भागाकडे दृष्टिक्षेप

–प्रा. एम. अे. कोहोक

मार्केटिंग म्हणजे विक्री करणे असा सर्वसामान्य समज आहे. याठिकाणी, वस्तूचे उत्पादन होऊन वस्तू विक्रीसाठी तयार आहे असे गृहित धरून वस्तु विकण्याच्या प्रयत्नांना मार्केटिंग म्हटले जाते. परंतु मार्केटिंगच्या नव्या कल्पनेत ग्राहकास आवश्यक असेल, त्याच्या खिशास परवडू शकेल, त्यास वापरता येईल व ज्यामुळे ग्राहकाचे राहणीमान उंचावण्यास मदत होईल अशी वस्तू तयार करून विकणे इतका व्यापक अर्थ अभिप्रेत आहे. तयार वस्तू विकून ती वापरावयास लावणे आणि ग्राहकास वापरता येईल अशी वस्तू तयार करून विकणे हा जुन्या व नव्या कल्पनांमधील फरक आहे.

मार्केटिंगच्या नवीन कल्पनेप्रमाणे उपभोक्त्यांच्या वस्तूचे उत्पादन संभाव्य ग्राहकांच्या बहुविध बाजूंचा साकल्याने विचार करून करावयास हवे. पण प्रत्यक्षात आपल्या देशात असे होते काय ?

ग्राहकोपयोगी वस्तूंचे उत्पादन

देशातील ग्राहकोपयोगी वस्तूंचे उत्पादन करणाऱ्या कारखान्यातील एकंदर उत्पादनक्षमतेचा विचार करता असे आढळून येते की, पूर्ण उत्पादनक्षमतेचा वापर करून घेतला जात नाही. उत्पादनक्षमता पूर्णपणे वापरली जात नाही याचा अर्थ असा होतो की, देशात उत्पादित वस्तूंना मागणी नाही. भारतासारख्या खंडप्राय देशात ५४ कोटी लोकसंख्या असताना वस्तूंना मागणी नसणे ही मोठी गमतीची गोष्ट आहे. अपुऱ्या मागणीची जबाबदारी लोकांच्या कमी खरेदी-शक्तीवर टाकून उत्पादक नामानिराळे होऊ पहातात.



अपुऱ्या मागणीची जबाबदारी लोकांच्या घटत्या खरेदीशक्तीवर टाकून उत्पादक नामानिराळे होऊ पाहतात.

खरेदी-शक्तीचे परीक्षण

देशातील ५४ कोटी लोकसंख्येपैकी १० कोटीवर लोक शहरांमधून राहतात आणि ४३ कोटीवर लोक देशभरांतील पाच लक्ष खेड्यांमधून विखुरलेले आहेत. शहरातील लोकांना तयार बाजारपेठ असल्याने किंबहुना उत्पादनच त्यांच्याकरिता केले जात असल्याने वस्तू सहज उपलब्ध होऊ शकतात. प्रश्न आहे ग्रामीण भागातील खरेदी-शक्ती कमी लेखून उपेक्षिलेल्या विशाल ग्रामीण बाजारपेठेचा. त्याकरिता ग्रामीण भागातील खरेदी-शक्तीचे क्ष-किरण परीक्षण आवश्यक ठरते.

प्रा. वि. म. दांडेकर व श्री. रथ यांनी सुचविल्याप्रमाणे ग्रामीण भागात, किमान पातळीवरील राहणीमान जगण्यासाठी वार्षिक दरडोई उत्पन्न रु. १८० आवश्यक असते. परंतु देशातील १६ कोटी लोक किमान दरडोई उत्पन्न मिळवू शकत नाहीत. त्यामुळे अर्थातच हे लोक औद्योगिक वस्तूंचे ग्राहक बनण्यास असमर्थ ठरतात. म्हणून त्यांना संभाव्य ग्राहक या संज्ञेतून वगळू या.

नॅशनल सॅंपल सर्वे नंबर १३८, सोळाव्या फेरीप्रमाणे ग्रामीण भागात सरासरी दरडोई उपभोग्य खर्च दर वर्षी रु. २६१.२ आहे.



या साऱ्या नव्या नव्या वस्तूत मला उपयुक्त काय ? असा प्रश्न ग्राहकापुढे असतो.

तेव्हां किमान पातळीवरील राहणीमानाने जगण्यासाठी आवश्यक उत्पन्न व सरासरी दरडोई उपभोग्य खर्च या गटात १२ कोटी ग्रामीण लोक बसतात. हे लोक काही औद्योगिक वस्तूंचा उपभोग घेऊ शकतात. परंतु त्यामुळे खात्रीशीर बाजारपेठ तयार होऊ शकत नाही. म्हणून या १२ कोटी लोकांचा संभाव्य ग्राहक म्हणून विचार करणे लाभप्रद ठरत नाही.

नॅशनल सॅंपल सर्वेने सुचविलेला दरडोई उपभोग्य खर्च आणि वार्षिक उत्पन्न रु. ५०० या दरम्यान असलेले १२ कोटी लोक ग्रामीण भागात राहतात आणि दरडोई वार्षिक रु. ५०० उत्पन्नापेक्षा जास्त उत्पन्न असलेले २·८ कोटी लोक राहतात. हे २.८ कोटी लोक जास्त उत्पन्न असल्याने औद्योगिक वस्तूंचे नियमीत ग्राहक आहेत. तेव्हा आपण या निष्कर्षाप्रत येऊन पोहोचतो की, ग्रामीण भागातील १२ कोटीवर लोक हे कारखान्यात तयार होणाऱ्या उपभोक्त्यांच्या वस्तूंचे ग्राहक बनू शकतील.

आजची गरज

औद्योगिक उत्पादकांनी आजपर्यंत ग्रामीण भागात विखुरलेल्या या १२ कोटी ग्राहकांना विविध वस्तूंपासून वंचीत ठेऊन खालच्या दर्जाचे राहणीमान जगण्यास भाग पाडले आहे. तेव्हां आज गरज आहे ती या ग्राहकांसाठी उत्पादन करण्याची. या ग्राहकांना माफक किमतीच्या पुढील प्रकारच्या विविध वस्तू हव्या आहेत :–रेडिओ, सायकल, मनगटी घड्याळे, विजेचे दिवे व इतर उपकरणे, कपडा, तयार कपडे, पादत्राणे, साबण, घरगुती औषधे, सौंदर्य प्रसाधने, स्वयंपाक घरातील भांडी व इतर उपकरणे, स्टोव्ह, खेळणी, शैक्षणिक गरजेच्या वस्तू इ. या वस्तू त्यांना उपलब्ध करून दिल्या तर उत्पादकांना स्वार्था बरोबरच परमार्थाचे पुण्य घेता येईल. वस्तूंची विक्री वाढल्याने नफा वाढेलच पण त्याबरोबरच ग्रामीण ग्राहकांचे राहणीमान उंचावण्याचे पुण्य पदरी पडेल. श्री. पॉल माझुर यांनी म्हटले आहे की, 'मार्केटिंग म्हणजे चांगल्या राहणीमानाचे वितरण'. (Marketing is the delivery of Standard of living) या प्रमाणे औद्योगिक वस्तूंचे उत्पादक पंचवार्षिक योजनेतील राहणीमान वाढविण्याचे ध्येय साध्य करण्यास हातभार लावू शकतील.

ग्रामीण भागातील ग्राहकांसाठी वस्तू तयार करताना ज्याप्रमाणे त्यांची खरेदीशक्ती विचारात घ्यावयास पाहिजे त्याचप्रमाणे

ग्रामस्थांच्या विशिष्ट गरजा, लकबी, समजूती लक्षात घेऊन उत्पादन केले पाहिजे.



ग्रामीण भागातील कच्च्या सडकांवर विविध प्रकारची ओझी वाहून नेऊ शकेल अशी मजबूत सायकलच हवी.

एक उदाहरण

ग्रामीण भागात दळणवळणाचे एकमेव सोयीस्कर साधन म्हणजे सायकल होय. सायकल चालविण्यास कोणत्याही प्रकारचे इंधन लागत नाही. आजच्या इंधन टंचाईच्या काळात हे विशेष महत्वाचे आहे. ग्रामस्थांना सायकलचे बहुविध उपयोग होतात. सायकलमुळे ग्रामस्थांना शहरातील आर्थिक व सांस्कृतिक जीवनाशी संपर्क साधणे शक्य होते. गवळी नजीकच्या शहरात दूध पोहचवू शकतो तर शेतकरी भाजीपाला व फळे. मुलांना शहरातील शाळा–कॉलेजात जाणे शक्य होते ते केवळ सायकलमुळेच. पण आजची सायकल त्यांच्या गरजा समाधानकारकरीत्या भागवत नाही. कारण देशात तयार होते ती रेसींग सायकल वजनाने हलकी, परकीयांची नक्कल करून तयार केलेली. ग्रामस्थांना नाईलाजाने ती वापरावी लागते. त्यांना हवी आहे अशी सायकल की, जीवर दोन व्यक्ती बसू शकतील किंवा बराचसा बोजा सायकलवर लादता येईल. मडगार्डमध्ये असा बदल हवा की, पावसाळ्यात चिखलपाण्याच्या व उन्हाळ्यात धुळीने भरलेल्या रस्त्यावर सायकल विनासायास चालू शकेल. तिच्या धावा व चेन बळकट असतील. गवळ्यास दुधाच्या बरण्या चांगल्या तऱ्हेने नेता येतील. अशा प्रकारे ग्रामीण भागातील ग्राहक वाट पहात आहेत ती अशा सायकलींची आणि वस्तूंची, ज्या त्यांचे खडतर जीवन सुसह्य करतील; त्यांच्या उत्पन्नाच्या वाढीस हातभार लावतील.

प्रा. कोहोक, कला, विज्ञान, वाणिज्य महाविद्यालय, नंदुरबार.

पत्रव्यवहार

श्री. संपादक योजना यांस,

योजना दि. १–१०–७४ च्या अंकात **श्री.** खु. चिं. पेंडसे यांच्या "मागास वर्गीयांचा व भागांचा विकास" या लेखामधील एक चूक निदर्शनास आणण्यासाठी हे पत्र लिहीत आहे.

श्री. पेंडसे म्हणतात की "महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने पाचव्या पंचवार्षिक योजनेच्या काळात मागासलेल्या जिल्ह्यांना एकूण ३० कोटी **अनुदान** देण्याचे ठरवले आहे." हे विधान बरोबर नाही. महाराष्ट्राच्या मागास विभागाच्या विकासासाठी अनेक संस्था महाराष्ट्र सरकारने स्थापन केल्या. त्यापैकीच सिकॉम ही एक संस्था आहे. सिकॉमतर्फे पॅकेज स्कीम ऑफ इन्सेन्टिव्हस् ही योजना राबविण्यात येते. या योजनेकरता पाचव्या पंचवार्षिक योजनेत ३० कोटींची तरतूद करण्यात आली आहे. ही रक्कम **कर्ज व अनुदान** या दोन्हीसाठी आहे. केवळ अनुदान म्हणून नव्हे.

अ. ज. लवकरे, प्रसिद्धी व जनता संपर्क अधिकारी, सिकॉम, मुंबई.

(मंदीची चाहूल? पान १५ वरून)

तेव्हा चोरट्या व बेकायदेशीर उत्पादनास कर्जपुरवठा निर्बंध व ग्राहक प्रतिकाराने चिमटा बसत आहे, ही चांगली गोष्ट होय. हे अर्थव्यवस्थेच्या हिताचेच आहे. चोरट्या व बेकायदेशीर उत्पादनाविरुद्ध सरकारने काळजीपूर्वक, सर्वंकष व खंबीर उपाययोजना लौकर करावी. उत्पादनवाढीस चालना मिळण्याच्या दृष्टीने असे निरोगी वातावरण देशात निर्माण व्हायलाच हवे. त्याचबरोबर कच्चा व अर्धापक्का माल आणि कर्जपुरवठा हे उत्पादक कार्यासाठीच वापरले जातील याविषयी आवश्यक त्या उपाययोजना कराव्यात. मात्र 'मंदीची लाट येत आहे' या आवईमुळे सरकारने कोणत्याही परिस्थितीत कर्जपुरवठा व इतर बाबतीत नरमाईचे धोरण मुळीच स्वीकारू नये.

बऱ्याच उद्योगपती व व्यापाऱ्यांच्या स्वार्थी, देशहित व जनहितविरोधी कारवाया विसरता येणार नाहीत. त्याचबरोबर कांही प्रामाणिक उद्योगपती, व्यापारी आहेत व त्यांच्या कांही खऱ्याखुऱ्या अडचणी आहेत, असू शकतात हेही कदापी विसरून चालणार नाही. तेव्हां सध्या मंदीची शक्यता नसली तरी सरकारने पुरेसे जागरूक राहिलेच पाहिजे आणि आवश्यक त्या उपाययोजना वेळीच, खंबीरपणे करण्याची तयारी ठेवली पाहिजे.

श्री. सोनवणे,
गणपत म्हात्रे बिल्डिंग, नानेपाडा,
मुलुंड (पू), मुंबई-८१

योजना हे पाक्षिक नियोजन मंडळाच्या वतीने, माहिती व नभोवाणी खात्याच्या प्रकाशन विभागातर्फे प्रकाशित होत असले तरी ते नियोजन मंडळाचे वा भारत सरकारचे मुखपत्र नव्हे. ह्या पाक्षिकात देशापुढील आर्थिक व सामाजिक समस्यांवर खुली चर्चा केली जाते. आणि त्या दृष्टीने योजना हे अभ्यासू वाचकांना एक उपयुक्त पाक्षिक ठरावे.

योजनेत प्रसिद्ध होणाऱ्या लेखातून व्यक्त होणारी मते ही त्या त्या लेखकाची असतात.

योजना दर महिन्याच्या १ व १५ दिनांकास प्रकाशित होते. मराठीखेरीज ते इंग्रजी, हिन्दी, गुजराती, बंगाली, असामी, तमिळ, तेलगु व मल्याळम् भाषातूनही प्रसिद्ध होते.

योजनेसाठी पाठविण्यात येणारे लेख **खास ह्या पाक्षिकासाठीच** असावेत. स्वीकृत साहित्य यथावकाश प्रसिद्ध केले जाईल. मात्र साहित्य प्रसिद्ध करण्यासंबंधात पत्रव्यवहार केला जाणार नाही. अस्वीकृत साहित्य तीन महिन्यानंतर नष्ट केले जाईल. अस्वीकृत लेखांची प्रत परत हवी असेल तर सोबत पुरेसे टपाल हशील पाठवावे. अंकात प्रसिद्ध होणाऱ्या साहित्याला मोबदला दिला जाईल.

योजनेतील साहित्य विनामूल्य पुन्हा प्रकाशित करता येईल, परंतु ते करताना योजनेचा उल्लेख करावा व त्या अंकाच्या दोन प्रती आमच्याकडे पाठवाव्या.

लेख, वार्षिक वर्गणी, जाहिरात व इतर व्यावसायिक पत्रव्यवहारासाठी पत्ता :
संपादक 'योजना', 'योजना' पाक्षिक कार्यालय, ३८, युसुफ बिल्डिंग, ४ था मजला, वीर नरीमन रोड, फोर्ट, मुंबई-४०० ००१.
दूरध्वनी क्रमांक २५०४६१

मराठी योजनेची वा. वर्गणी ६ रु. द्वैवार्षिक १० रु., त्रैवार्षिक १४ रु. विद्यार्थी, अध्यापक व वाचनालये यांना २५ टक्के सूट



वेडात खरोखर जग जगते !

——लक्ष्मीदास बोरकर

शहाणा अन् वेडा यामधील सीमारेषा ठरविता येणं कठीण आहे. कधी-कधी शहाणी म्हणविणारी माणसं वेड्यासारखी वागतात अन् वेडी शहाण्यासारखी बोलून जातात. गाढ विद्वान् हे एक प्रकारच्या विलक्षण वेडानं झपाटलेले प्राणी असतात. जीवजंतूशास्त्राचं संशोधन करणाऱ्या प्रकांडपंडिताला, कंसाला ठायी ठायी कृष्ण दिसायचा तसे जळी स्थळी सूक्ष्म जीवजंतू दिसतात. ओठा-बाटे शरीरात जंतू प्रवेश करतील या भीतीनं असा एक शास्त्रज्ञ पत्नीचं चुंबन घ्यायला सुद्धा तयार व्हायचा नाही !

एकादा ठार वेडासुद्धा आपल्या वेडाच्या तंद्रीत शहाणपणाची चमक दाखवून जातो. भर रस्त्यात एका कोपऱ्यात हातात पेपर घेऊन वेड्यासारखी मान गरा-गरा फिरविणाऱ्या माणसाला एका शहाण्या माणसानं सकाळीच विचारलं की काय हो, तुम्ही मान गरागरा फिरविता ना ? तो सूर्य खाली आणा पाहूं ? त्यावर तो वेडा म्हणाला, "संध्याकाळी या. सूर्य खाली आणून दाखवतो." या माणसाला तुम्ही काय म्हणणार ? शहाणा की वेडा ?

पोर्तुगीज भाषेत एक म्हण आहे. तिचा अर्थ असा की, माणसाला तीन गोष्टी उपजत असतात. संगीताचं अंग, वैद्यकीय ज्ञान अन् वेडाचा अंश ! माणूस कितीही अरसिक असला तरी त्याला निदान बाथरूममध्ये गुणगुणायला आवडतं. कुणाला कसलाही आजार झाला की, प्रत्येक जण काही ना काही उपाय सुच-विल्याशिवाय राहात नाही. तसंच माणूस कितीही शहाणा असला तरी त्याला कधीतरी वेड्यासारखी वागण्याची लहर येतेच येते. शहाण्या अन् वेड्या माणसात फरक एवढाच की, शहाण्यामधील वेडाचा अंश त्याच्या शहाणपणाच्या आवरणा-खाली झाकलेला असतो अन् वेड्यामधील शहाणपणाची चमकसुद्धा वेडात गणली जाते !

पुष्कळ वेळा आयुष्यात धक्कादायक प्रसंग घडला तर माणसामधील उपजत वेडाचा अंश उफाळून वर येतो. लोक म्हणतात, "अरेरे ! याला बिचाऱ्याला वेड लागलं की हो." पण खरोखर ते वेड नवीन लागलेलं नसतं. स्वीच दाबल्यावर विजेचा दिवा जसा झगझगीत पेटतो तसा त्या धक्क्यानं त्याच्यातील वेडाचा दिवा 'ऑन' झालेला असतो एवढंच.

असाच एक करुण प्रसंग नवसारी या गांवी एका महिलेवर ओढवला. महिन्यापूर्वी तिचा एकुलता एक मुलगा नवसारी स्टेशनजवळ अपघातानं मरण पावला. मुलगा किंचित् वेडसर होता. रेल्वे लाईन क्रॉस करून जाणं बरं नाही याचं भान त्याला उरलं नाही आणि त्यातच त्याला जीव गमवावा लागला. मुलाच्या मृत्यूनं आईवर आकाश कोसळलं.

शेजाऱ्यापाजाऱ्यांनी बाईची समजूत घालण्याचा प्रयत्न केला. "तुझा मुलगा रेल्वे अपघातात मेला. तूं मन घट्ट कर अन् दुःख विसरून जा" असं तिला सांगून पाहिलं. पण मुलाच्या निधनाच्या वृत्तावर विश्वास ठेवायलाच ती तयार नव्हती. आपला मुलगा बाहेर गेला आहे अन् तो कुठं तरी हरवला आहे अशीच तिची पक्की समजूत होती. म्हणून ती रोज मुलाच्या तपासासाठी घराबाहेर पडे. नी दिवसभर घिरट्या घालून निराश होऊन घरी परत येई.

कुणी तरी तिला कोर्टात जाऊन तक्रार नोंदविण्याचा अनाहूत सल्ला दिला. सरकारनं 'मिसा' खाली बड्या बड्या स्मगलरांना स्थानबद्ध करून ठेवलं होतं. पण त्यांच्या वतीनं कोर्टात 'हेबियस कॉर्पस' अर्ज दाखल करताच सरकारला झक्कत स्मगलरांना कोर्टासमोर हजर करावंच लागलं. तूं पण 'हेबियस कॉर्पस' अर्ज कर अन् मुलाला कोर्टात जातीनं हजर करण्यात यावा अशी विनंती कर. नक्की तुझा हरवलेला मुलगा सापडेल, असं तिला सांगितलं.

बाईच्या मनात आशेचे अंकुर उगवले. ती नवसारी कोर्टात गेली अन् आपला मुलगा परत मिळावा अशी तिनं मागणी केली. मुलगा हरवला असल्यानं माता भ्रमिष्ट झाली आहे हे मॅजिस्ट्रेटनी ओळखले. भग्न हृदयी मातेला तडकाफडकी हुसकावून लावण्याची त्यांना हिंमत झाली नाही. त्यांनीं तिच्या अर्जाच्या सुनावणीला पुढची तारीख दिली व त्या दिवशी मुलगा परत मिळेल असं सांगून तिची बोळवण केली. मॅजिस्टेटने केवळ आजच संकट पुढं ढकललं होतं. कारण मॅजिस्ट्रेटनें दिलेल्या तारखेला ती बाई नवसारी कोर्टात हजर झाली अन् आपला हरवलेला मुलगा मागू लागली. मॅजिस्ट्रेटनी मुकाट्यानं बाईला पुढची तारीख दिली व पुढच्या खेपेला मुलगा नक्की मिळेल असं आश्वासन दिलं. बाई निमूटपणं परत गेली. ठरलेल्या दिवशी पुन्हा कोर्टात हजर झाली. बाई दिसली रे दिसली की, मॅजिस्ट्रेट एका कागदाच्या कपट्यावर तिला पुढची तारीख लिहून द्यायचे अन् तिची परत पाठवणी करायचे. ते तरी बिचारे आणखी काय करणार होते ?

असा हा प्रकार जवळजवळ सहा महिनेपर्यंत अव्याहतपणं चालू राहिला आणि अशा प्रकारे बाईच्या कोर्टात तेरा फेऱ्या झाल्यावर तिच्या सहनशीलतेचेही तीन तेरा वाजले. तेराव्या खेपेला बाई कोर्टात आली. तिच्या अंगावरचे कपडे फाटलेले होते. काठी टेकत टेकत ती कोर्टाच्या आवारात शिरली. बाकडयावर जाऊन बसली. मॅजिस्ट्रेट येताच जागची उठली. मोठ्या कष्टानं ती मॅजिस्टेटच्या टेबलाजवळ गेली अन् तिनं मुलाची मागणी केली !

मॅजिस्ट्रेटनी नेहमीप्रमाणे न बोलतां तिला पुढची तारीख देण्यासाठी पॅड पुढं ओढलं. पण या खेपेला बाईने मॅजिस्ट्रेटना विचारलं, "साहेब, प्रत्येक खेपेला तुम्ही मला रिकाम्या हातानी परत पाठविता हे तुमच्या प्रतिष्ठेला शोभून दिसतं का ? माझी ही तेरावी खेप आहे. अद्याप मला माझा मुलगा परत मिळालेला नाही. माझी सहनशक्ती आता संपत आली आहे".

मॅजिस्ट्रेटनी हताश मुद्रेनं तिच्याकडे पाहिलं. कारण आता त्यांचीही सहनशीलता संपत आली होती. पण ते पडले न्यायाधीश. न्यायदेवता आंधळी असते. तशीच ती मुकी अन् बहिरी असते, असावी लागते. सामान्य माणसा-प्रमाणं न्यायाधीशाना चिडून चालत नाही. त्यानी काहीही न बोलता पॅडवर पुढची तारीख लिहिली अन् ती चिठ्ठी बाईच्या पुढ्यात धरली. बाईनी ती चिठ्ठी न घेता म्हटलं, "इतका प्रदीर्घ काळ माझा एकुलता मुलगा मला परत मिळू शकत नाही अन् याबाबतीत कायदा काहीच करू शकत नाही तर मला काय वाटेल याची कल्पना करा ना साहेब."

मॅजिस्ट्रेट गप्पच. त्यांनी न बोलताच ती चिठ्ठी पुन्हा एकदा बाईच्या पुढं केली. बाईनी चिठ्ठी घेतली, वाचली अन् मॅजिस्ट्रेटना परत केली. बाईनं म्हटलं, "साहेब, ही फार लांबची तारीख झाली. मला जवळची तारीख द्या ना."

मॅजिस्ट्रेटनी मौनव्रत सोडलं नाही. त्यांनी बाईकडून ती चिठ्ठी परत घेतली, चिठ्ठीतली तारीख खोडून नवीन तारीख टाकली व तोच कागद बाईकडे परत दिला.

बाईनी तो कागद घेतला. मॅजिस्ट्रेटना वाकून अभिवादन केलं अन् जाऊं लागली. जाताना ती मॅजिस्ट्रेटना म्हणाली,


"साहेब, तुम्हाला आधीच सांगून ठेवते. पुढच्या खेपेला मी तुमच्याकडून तारीख घेणार नाही. तुम्हाला माझा मुलगाच द्यावा लागेल."

मॅजिस्ट्रेटनी चकार शब्द उच्चारला नाही. कोर्टात उपस्थित असलेले लोक म्हणाले, "बाईला वेड लागलंय !"

असेल. पण त्या वेडापायीच ती बाई जिवंत राहिली आहे. असल्या या वेडाला नावं ठेवण्याचा वेडेपणा शहाण्या जगानं करावा का ?

श्री बोरकर, प्रमुख उपसंपादक
दै. लोकसत्ता, मुंबई.

बालगुन्हेगाराचा अभ्यास व त्याचा कारणमीमांसा जगातील अनेक मानसशास्त्रज्ञांनी केलेली आहे. या शास्त्रज्ञांच्या मते बालगुन्हेगारीला कोणतेही एक प्रमुख कारण नसून एकापेक्षा अनेक कारणे जेव्हा एकाच वेळी उद्भवतात तेव्हा त्यातून बालगुन्हेगारीचा जन्म होतो. मुलांच्या आवडीनिवडी, जिज्ञासा, आशाआकांक्षा, शारीरिक सुरक्षितता या मूलभूत बाबींची त्यांच्या बालवयातच जर योग्य दखल घेण्यात आली नाही तर त्यांच्या हातून समाजविघातक कृत्ये घडतात. अशी दुष्कृत्ये करणाऱ्या १८ वर्षाखालील बालकांना बालगुन्हेगार म्हणून संबोधले जाते. प्रत्येक समाजात बालगुन्हेगार असतात. अल्प वयातच लहानसहान चोऱ्या करणे, खून करणे, खोटच्या सह्या करणे, मोठ्या गुन्हेगारांना मदत करणे या प्रकारचे गुन्हे त्यांच्याकडून घडतात. निढावलेले गुन्हेगार त्यांना गुन्हे करण्याचे शिक्षण देतात, त्यांना गुन्हे करायला प्रवृत्त करतात. त्यामुळे अलीकडे बालगुन्हेगारांची संख्या वाढली आहे.



बालगुन्हेगारी
समस्या व उपाययोजना

—खु. चिं. पेंडसे

लहानपणीच सुसंस्काराची जरूरी

मुलांच्या व्यक्तिमत्वाच्या घडणीत घराला फार महत्वाचे स्थान आहे. मूल घरात जन्माला आले तरी ते त्या ठिकाणच्या संस्काराने घडविले जाते. आईवडील, बहीणभावंडांचे प्रेम, कुटुंबाची आर्थिक स्थिती, शैक्षणिक व शारीरिक संरक्षणाची हमी त्यांना मिळू लागते आणि त्यातून त्यांच्या व्यक्तिमत्वाच्या घडणीस प्रारंभ होतो. कुटुंबाची शैक्षणिक व आर्थिक परिस्थिती, आईवडिलांचा स्वभाव, मित्रमंडळीची संगत, सभोवतालची परिस्थिती या व अशा अनेक बाबींचा मुलांच्या व्यक्तित्वविकासावर परिणाम घडून येतो. कुटुंबातील वरील सद्भावांचा व चांगल्या वातावरणाचा मुलांच्या मनावर चांगला परिणाम होतो. याच्या उलट कुटुंबातील दूषित वातावरणाचा मुलांच्या मनावर प्रतिकूल, वाईट परिणाम होतो. म्हणून कुटुंबातील दूषित वातावरण बालगुन्हेगारीला एक प्रमुख कारण ठरले आहे. कुटुंबातील मातापित्याच्या कडक शिस्तीपेक्षा फाजील लाडांचा परिणाम अधिक घातक असतो. आईवडिलांचे बिघडलेले संबंध, त्यांच्यातील भांडणे, सावत्र आई, घटस्फोट घेतलेले आईबाप, कुटुंबातील मंडळींची दुर्व्यसने यामुळे मुलांवर विपरीत परिणाम होतो.

मुलात निर्माण झालेली विफलता व निराशा त्याच्या ठिकाणी

आजकाल आपल्या देशात सामाजिक व नैतिक अधिष्ठान घसरत चालल्याने मुलांची गुन्ह्याकडे प्रवृत्ती वाढत आहे. आईवडिलांचा मुलांवर फारसा ताबा राहिलेला नाही आणि अनेकजण आपल्या मुलांच्या दुष्कृत्याकडे दुर्लक्ष करतात, त्यामुळे मुले उनाड व गुन्हेगार बनतात. बालवयात गुन्हेगारी फार लहान स्वरूपाची असते पण वाढत्या वयाबरोबर व्यापक होऊन ती एक सामाजिक समस्या बनते.

सूडभावनेचा अंकूर निर्माण करते. आणि पुढे यातूनच त्याच्या हातून विघातक दुष्कृत्यांचा महावृक्ष तयार होतो. बहुधा गुन्हेगारांची मुले गुन्हेगार निपजतात असे आढळत असले तरी गुन्हेगारीचे खरे कारण आनुवंशिकता नसून मूल ज्या वातावरणात राहते व वाढते ते वातावरणच त्याच्या गुन्हेगारीच्या मुळाशी असते. मुलाच्या सभोवतालची परिस्थिती, वाईट मित्र-परिवार, गलिच्छ रहाणी याचा त्यांच्यावर वाईट परिणाम होतो. घाणेरड्या वस्त्यातील प्रौढांच्या अयोग्य वातावरणाचा बालमनावर अनिष्ट परिणाम होतो.

मानसिक विकृती

मानसिक विकृती व शारीरिक व्यंग हेही बालगुन्हेगारीला एक कारण ठरले आहे. पुष्कळ वेळा असे आढळून आले आहे की मानसिक विकृती ही बाह्य परिस्थितीमुळे किंवा शारीरिक व्यंगामुळे निर्माण होत असते. एकदा मानसिक विकृती निर्माण झाली की मुलाच्या हातून गुन्हा घडतो. अयोग्य संस्कार हे गुन्हेगारीचे एक प्रमुख कारण आहे. अयोग्य संस्काराला कारणीभूत झालेल्या अनेक गोष्टी समाजात आढळतात. अश्लील चित्रपट, नाटकें, कादंबऱ्या, मासिके, तमाशे इत्यादींच्या स्वैर कथानकामुळे मुले बिघडतात. योग्य मेळ व छंद इत्यादींचा अभाव मुलांच्या गुन्हेगारीला कारण ठरतो. "रिकामे मन हे सैतानाचे निवासस्थान असते" अशी इंग्रजीत एक म्हण आहे. मुलांच्या मनाला रिकामे न ठेवता गुंतवून ठेवण्यासाठी क्रीडा मंडळें, व्यायामशाळा, वाचनालये वगैरे संस्थांना फार मोठे महत्व आहे. पण वरील प्रकारच्या संस्थांची समाजात उणीव असेल तर मुलांच्या गुन्हेगारीला उत्तेजन मिळते. याशिवाय आधीच सांगितल्याप्रमाणे अज्ञान, दारिद्र्य, विषम समाजरचना, आनुवंशिकता, मानसिक विकृती, वाईट परिस्थिती, सहानुभूतीशून्य वागणूक गुन्हेगारीला जन्म देत असते. ही गुन्हेगारी नष्ट करण्याचा उत्तम उपाय म्हणजे वरील गुन्ह्याची कारणें नष्ट करणे हे होय.

समाजकल्याण केंद्रांची गरज

हल्लीच्या नागरीकरणाचा व औद्योगीकरणाचा समाजाच्या आर्थिक परिस्थितीवर परिणाम झालेला दिसून येतो. म्हणून बालकांना योग्य वातावरणाचा लाभ मिळवून देण्यासाठी समाजकल्याण केंद्रांची आवश्यकता असते. अशी केंद्रे जितक्या अधिक प्रमाणात निर्माण केली जातील तितक्या प्रमाणात बालमनाला नियंत्रणात ठेवणे सुलभ होईल. योग्य कौटुंबिक वातावरण निर्मितीसाठी समाजकल्याण केंद्र पोषक ठरते. शहरातून घाणेरड्या व दाटीच्या वस्तीत रहाणाऱ्या बालकांच्या दृष्टीने

केंद्र वरदान ठरते. अशा केंद्रात सामाजिक कार्यकर्ते व समाजसेविका मिळून मुलांच्या दृष्टीने अनेक उपयुक्त योजना आखता येतात. तसेच शिशुगृहें, बालकसंस्था मार्फतही बालगुन्हेगारीवर नियंत्रण ठेवण्याचे कार्य केले जाऊ शकते. युवक क्लबसारख्या संस्थेद्वारे त्यांच्यात आत्मविश्वास, शिस्त, चारित्र्य, विधायक कार्याची आवड निर्माण करता येईल या दृष्टीने अशा केंद्राना पालकवर्ग व सामाजिक संस्थांनी सहकार्य केले पाहिजे. महाराष्ट्र शासनाने अशी केंद्रें स्थापली आहेत.

अल्पवयीन बालकाने केलेला गुन्हा हा एक सामाजिक रोग असून या वैगुण्याला सामाजिक परिस्थिती कारणीभूत आहे. ती नष्ट करण्याची जबाबदारी समाजावर व शासनावर आहे. या दृष्टीने सुधारणावादी सिद्धांताच्या भूमिकेतून मुलांची सुधारणा करण्यासाठी कायद्याचा जन्म झाला. राज्य शासनाने १९४८ साली गुन्हेगारीला आळा घालण्यासाठी गुन्हेगारीचे उच्चाटन करणारा कायदा पास केला. या कायद्यात निराश्रित बालगुन्हेगार, सामाजिक दुरावस्थेला बळी पडलेले बालक, युवकांचे संरक्षण व शिक्षण आणि उपाययोजना इत्यादींची तरतूद आहे. तसेच या कायद्यात आत्मीयतेचा सल्ला देणारे अधिकारी, बाल न्यायालये, स्त्री मॅजिस्ट्रेट, मानसशास्त्रीय उपचार वगैरेची तरतूद आहे. गेल्या २६ वर्षात या कायद्याचा लक्षावधी बालकांना लाभ मिळाला आहे.

बाल न्यायालये

बालगुन्हेगारांना सर्वसाधारण कोर्टातून शिक्षा देण्यात येत नाही. त्यांना पकडून रिमांड होममध्ये दाखल करण्यात येते. तेथे मानसशास्त्रदृष्ट्या त्यांच्या मनाचा अभ्यास करून त्यांची मानसिक विकृती नष्ट करण्यात येते. महाराष्ट्र राज्याच्या अनेक मोठ्या शहरी रिमांड होम्स् आहेत. रिमांड होममध्ये १८ वर्षाखालील मुलाला दाखल केल्यावर प्रोबेशन ऑफिसर मुलाच्या घरची, त्याच्या आईवडिलांची, त्याच्या सभोवतालच्या परिस्थितीची चौकशी करतो. मोठ्या आत्मीयतेने त्या मुलाकडून सर्व प्रकारची माहिती गोळा केली जाते. पुढे त्याला एका खास न्यायालयापुढे उभे केले जाते. या न्यायालयाला 'जुव्हेनाईल कोर्ट' असे म्हणतात. या कोर्टात आरोप-तक्रार, वकील, लोखंडी बेडया वगैरे काहीही नसते. न्यायाधीशाच्या परवानगीशिवाय वकीलाला सुद्धा येथे प्रवेश मिळत नाही. न्यायाधीशाच्या जोडीला दोन महिला-मॅजिस्ट्रेट असतात. सामान्य कोर्टात गुन्हा शोधून गुन्हेगाराला कायद्यानुसार शिक्षा करण्यात येते. परंतु या न्यायालयाचा उद्देश शिक्षा करण्याचा नसून गुन्ह्याची कारणे शोधून काढून व ती नाहीशी करून मुलांची सुधारणा करणे हा असतो. येथील सर्व वातावरण खेळीमेळीचे व भयरहित असते. बालन्यायालयातील चौकशी आटोपल्यावर मुलांना प्रमाणित शाळेत (Certified School) पाठविण्यात येते.

प्रमाणित शाळांची स्थापना

इतर शाळा व प्रमाणित शाळा यात फरक असतो. इतर शाळेत मुलांना पुस्तकी ज्ञान दिले जाते. प्रमाणित शाळेत मुलांची मानसिक व सामाजिक विकृती सुधारणे हा प्रमुख उद्देश असतो. बहुतेक प्रमाणित शाळा खुल्या असून त्यात मुलांना औद्योगिक व तांत्रिक शिक्षण दिले जाते. काही प्रमाणित शाळा कडक बंदोबस्तात असतात. कारण यथील मुले पळून जाऊ नयेत म्हणून कडक बंदोबस्त राखला जातो. प्रमाणित शाळेतील मुलांना शालेय शिक्षणाबरोबर पुस्तकबांधणी, सुतारकाम, बेतकाम, वायरमनचे काम, शिवणकाम, बागकाम, विणकाम वगैरे प्रकारचे औद्योगिक शिक्षण दिले जाते.

प्रमाणित शाळेत मुलांच्या प्रमुख गरजा भागविण्याकडे खास लक्ष दिले जाते. निवास, जेवण, पुरेसे कपडे, औषधोपचार याविषयी नियमितपणे व विशेष काळजी घेतली जाते. मुलांच्या शारीरिक व मानसिक आरोग्याची वेळोवेळी तपासणी केली जाते. त्यांच्या दैनंदिन कार्यक्रमात, प्रार्थनेला महत्वाचे स्थान असते. मुलांना वृत्तपत्रें, मासिके वाचायला दिली जातात. मुले चर्चामंडळे स्थापन करतात. एकंदरीत ज्ञान व करमणूक या दोन्ही गोष्टींची काळजी घेतली जाते. मुलांच्या कामाच्या समित्या असतात. सर्व मुलांना कोणत्या ना कोणत्या समितीत राहून सर्वांसोबत काम करावे लागते. दिवाळीच्या व उन्हाळ्याच्या सुटीत मुलांना घरी जाण्याची मोकळीक दिली जाते. समाजात मिसळण्याची संधी मिळाल्यामुळे मुले फार आनंदी असतात.

मानसशास्त्रदृष्ट्या येथे प्रत्येक मुलाचा अभ्यास करता यावा यासाठी त्याच्या जीवनातील ठळक घटनांचा वृत्तांत टिपून ठेवला जातो. व्यक्तिचिकित्सक (Case Worker) हा मुलांचा आधारस्तंभ असतो. व्यक्तिचिकित्सक मुलांच्या अडचणी ऐकून त्या निवारण्याचा प्रयत्न करतो. व्यक्तिचिकित्सक मुलांशी फार आत्मीयतेने वागतो, त्याच्या आईवडिलांशी भेट घडवून आणतो, त्याला संस्थेत राहण्याविषयी जाणीव करून देतो. मुलगा आपल्या वयाच्या १८ वर्षेपर्यंत येथे वास्तव्य करतो. यापुढे त्याला येथे रहाता येत नाही. फार तर आईवडील, मुलाची १८ वर्षे पुरी होण्याआधीच आपल्या खाजगी जबाबदारीवर मुलाला घरी नेऊ शकतात. मुदतीपूर्वी मुलाला पालकाच्या ताब्यात देण्याची कायद्यात तरतूद आहे.

समाजाची जबाबदारी

प्रमाणित शाळेत मुलाचा सर्वदृष्टीने व्यक्तिविकास घडवून आणला जातो. म्हणून बालगुन्हेगारांचा प्रश्न सोडविण्यासाठी समाजाने शासनाला सहकार्य दिले पाहिजे. मातापित्यांनी १८ वर्षानंतर आपल्या मुलाचा स्वीकार करून त्याला वाईट वळण लागणार नाही याची दक्षता घेतली पाहिजे. समाजाने अशा मुलांकडे सुधारणावादी दृष्टीकोनातून पाहिले पाहिजे. पालक, समाज व सरकार यांच्या परस्पर सहकार्यातून बालगुन्हेगारीचा प्रश्न सोडविणे शक्य होईल.

सर्वसाधारण गुन्हेगारीचे मूळ बालगुन्हेगारीत असल्यामुळे बालगुन्हेगारीचे प्रथम उच्चाटन करणे अगत्याचे आहे. मुले ही राष्ट्राची संपत्ती आहे असे नेहमीच म्हटले जाते. पण त्यांची नीट जोपासना करणे हे समाजाचे कर्तव्य आहे हे लक्षात घेतले जात नाही. आपल्या मुलांना सुसंस्कृत व सुसंपन्न करण्याच्या दृष्टीने आईवडिलांनी त्यांच्याकडे लक्ष दिले पाहिजे. तसेच गुन्हेगारीला प्रतिबंध करण्यासाठी शाळांतून नैतिक, सांस्कृतिक व मानसशास्त्रीय शिक्षण देणे आवश्यक आहे. त्याशिवाय बालगुन्हेगारीची सामाजिक कीड नष्ट होण्यास सहाय्य होणार नाही.

श्री. पेंडसे
रेशिम बाग, प्लॉट नं. १०३, नागपूर.

संपादक, मुद्रक व प्रकाशक : **अविनाश र. गोडबोले** (निदेशक, प्रकाशन विभाग, भारत सरकार ह्यांच्या वतीने) यानी असोसिएटेड ॲडव्हर्टायझर्स अँड प्रिन्टर्स, ५०५ ताडदेव, साने गुरुजी मार्ग, मुंबई ४०० ०३४ येथे छापून ३८ युसुफ बिल्डिंग, ४ था मजला, वीर नरिमन रोड, मुंबई-४०० ००१ येथे प्रसिद्ध केले.